अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | मंगळवार, दि. ०७ नोव्हेंबर २०२३ | ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : ४० वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## विश्वचषकात पहिल्यांदाच बांगलादेशने श्रीलंकेला हरवले



**दिल्ली :** बांगलादेशनं श्रीलंकेवर तीन विकेट्सनी मात करून, वन डे विश्वचषकात आपल्या दुसऱ्या विजयाची नोंद केली. बांगलादेश आणि श्रीलंका या दोन्ही संघांचं विश्वचषकातलं आव्हान संपुष्टात आलं आहे.

त्यामुळं त्या दोन संघांमधला सामना ही निव्वळ औपचारिकता होती. या सामन्यात श्रीलंकेनं बांगलादेशला विजयासाठी २८० धावांचं आव्हान दिलं होतं. नजमल हुसेन शान्तो आणि शाकिब अल हसननं तिसऱ्या विकेटसाठी रचलेल्या १६९ धावांच्या भागिदारीच्या जोरावर बांगलादेशनं त्या लक्ष्याचा यशस्वी पाठलाग केला. शान्तोनं ९० धावांची, तर शाकिबनं ८२ धावांची खेळी उभारली. त्याआधी, चरिथ असालंकानं झळकावलेल्या शतकानं श्रीलंकेला सर्व बाद २७९ धावांची मजल मारून दिली होती. विश्वचषकाच्या इतिहासात बांगलादेशने पहिल्यांदाच श्रीलंकेचा पराभव केला.


श्रीलंकेने दिलेल्या आव्हानाचा पाठलाग करताना बांगलादेशची सुरुवात खराब झाली. बांगलादेशला पहिला धक्का बसला तो १७ धावांवर. सलामीवीर तनजीद हसन ५ चेंडूत ९ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. तनजीद हसनला दिलशान मधुशंकाने बाद केले. बांगलादेशला दुसरा धक्का ४१ धावांवर बसला. लिटन दास २२ चेंडूत २३ धावा करून बाद झाला. दिलशान मधुशंकानेही लिटन दासला आपला शिकार बनवले. बांगलादेशच्या दोन विकेट झटपट गेल्या.

# भाजपच एक्का आधाडीला धक्का

## ▪ सोलापूर जिल्ह्यात ४९ ग्रामपंचायतींवर कमळ फुलले

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**महाराष्ट्राच्या आगामी विधानसभा निवडणुकीची सेमिफायनल म्हणून ज्या निवडणुकीकडे पाहिले जात होते, त्या सोलापूर जिल्ह्यातील १०९ ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचा कौल हाती लागला असून सत्ताधारी भारतीय जनता पक्षाने बहुतांशी तालुक्यात आपले वर्चस्व सिद्ध केले आहे.या निवडणुकीत परिवर्तनाची लाट दिसून आली. अक्कलकोट, माळशिरस, दक्षिण सोलापूर आणि मंगळवेढ्यात भारतीय जनता पक्षाने मोठे यश मिळविले आहे.१४ ठिकाणी अजितदादांच्या गटाने झेंडा फडकवल्याचे सांगण्यात आले.महाविकास आघाडीला सर्वत्र धक्का बसला आहे.**



सोलापूर जिल्ह्यातील १०९ ग्रामपंचायतींचे निकाल सोमवारी जाहीर झाले असून, भारतीय जनता पक्षाने सर्वाधिक ४९ ग्रामपंचायतींमध्ये बाजी मारली आहे. त्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार गटाने १४ ग्रामपंचायतींची सत्ता मिळविली आहे. उद्धव ठाकरे गट आणि काँग्रेस पक्षाची मात्र मोठी पीछेहाट झाली आहे.

भाजपने जिल्ह्यातील १०९ पैकी ४९ ग्रामपंचायतीत सत्ता मिळविली आहे, त्यामुळे पक्षाने पुन्हा एकदा जिल्ह्यावरील वर्चस्व अधोरेखित केले आहे. पंढरपूर तालुक्यात माजी आमदार प्रशांत परिचारक, उद्योगपती अभिजित पाटील यांनी अनेक ठिकाणी बाजी मारली असून काही ग्रामपंचायतींमध्ये परिवर्तन झाले असून तिथे स्थानिक गटांनी मुसंडी मारली आहे.सांगोला तालुक्यात विद्यमान आमदार शहाजीबापू पाटील यांनी प्रतिष्ठा पणाला लावून काही चिकमहूदसह काही ग्रामपंचायती जिंकल्या असून बहुतांशी ठिकाणी शेतकरी कामगार पक्ष व मित्र पक्षांचा वरचष्मा दिसून आला आहे.मोहोळ तालुक्यातील दोन पैकी मलिकपेठ ग्रामपंचायतीवर माजी आमदार राजन पाटील गटाने बाजी मारली असून जामगावची निवडणूक बिनविरोध झाली असून सरपंचपद भाजपने जिंकले आहे.

माढा तालुक्यातील टेंभुर्णी ग्रामपंचायतीत आमदार बबनदादा शिंदे यांच्या गटाला धक्का बसला आहे.तिथे भाजपचा वरचष्मा दिसून आला आहे. मंगळवेढा तालुक्यात आमदार समाधान अवताडे यांनी एकहाती वर्चस्व सिद्ध केले आहे.

अक्कलकोट तालुक्यात १८ पैकी १६ ग्रामपंचायती भाजपने जिंकल्या असून उर्वरित ग्रामपंचायतींवर काँग्रेसने ताबा मिळवला आहे.या ठिकाणी आमदार सचिन कल्याणशेट्टी आणि काँग्रेसचे नेते सिद्धाराम म्हेत्रे यांनी प्रतिष्ठा पणाला लावली होती.

बार्शीत सोपल-राऊत गटात अटीतटीचा सामना झाला असून दोन्ही गटांकडून पाचही ग्रामपंचायतींवर विजयाचा दावा केला गेला आहे. बार्शी तालुक्यात पाचपैकी बहुतांश ग्रामपंचायतींवर सोपल आणि राऊत गटाकडून दावा करण्यात आला आहे. पाच ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीत मतदारांनी नोटाला १३६ मते दिली आहेत.

### माळशिरसमध्ये यादव गटाचे वर्चस्व

माळशिरस ग्रामपंचायतच्या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये काँग्रेसचे युवक तालुकाध्यक्ष माऊली यादव यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अरुण यादव यांना दोघी पछाड देत अरुण यादव यांच्या पत्नी मनीषा यादव यांचा ३३५ मतांनी पराभव करत माऊली यादव यांच्या पत्नी आरती यादव या सरपंच पदी विजयी झाल्या. दहा मते नोटाला गेली. सदस्य पदाच्या आठ जागा मिळवत माउली यादव यांनी ग्रामपंचायती वरती देखील स्पष्ट बहुमत मिळवले .ग्रामपंचायत मध्ये यामुळे माऊली पर्वाचा आता उदय झाला .

### राज्यातही भाजपची हुकूमत...

एकूण ग्रामपंचायत २९५०

| | | | |
|---|---|---|---|
| भाजप | ६५४ | ठाकरे गट | ११० |
| अजित पवार गट | ३९२ | शरद पवार गट | १४५ |
| शिंदे गट | २८९ | काँग्रेस | २७१ |

इतर : ३४६

### दक्षिण तालुक्यात काटे की टक्कर

दक्षिण सोलापूर तालुक्यात भाजपच्या विरोधात सर्वपक्षीय आघाडी करण्यात आली होती. कासेगाव आणि कुसूरमध्ये भाजपने वर्चस्व प्रस्थापित केले असून ७ पैकी भाजपने ४ ग्रामपंचायती भाजपने जिंकल्या असून उर्वरित ठिकाणी आघाडीने सत्ता काबिज करून विद्यमान आमदार सुभाष देशमुख यांना जबर धक्का दिल्याचे सांगण्यात आले. मनगोळी ग्रामपंचायतीत भाजपा आमदार सुभाष देशमुख यांना धक्का बसला आहे. मनगोळी ग्रामपंचायतीतील सुभाष देशमुख गटाची पंधरा वर्षाची सत्ता कोसळली आहे. सर्वांचे लक्ष लागलेल्या कासेगाव, उळे आणि वळसंग ग्रामपंचायत मध्ये अनेक वर्षानंतर परिवर्तन झाल्याचे पाहायला मिळाले. औज सरपंच एक मतांनी विजय तर तिल्हेहाळ बिनविरोध झाली असून हत्तूर पोटनिवडणुकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाचे जिल्हा उपप्रमुख अण्णाप्पा सतुबर यांची सत्ता आली आहे.

### करमाळ्यात नारायण पाटलांनी ३० वर्षांची सत्ता राखली



करमाळ्याचे माजी आमदार नारायण पाटील यांनी जेऊर ग्रामपंचायतीवर १९९२ पासून असलेली सत्ता या वेळी कायम राखली आहे. या निवडणुकीचे वैशिष्ट्य म्हणजे ग्रामपंचायतीची सत्ता राखतानाच नारायण पाटील यांनी मुलगा पृथ्वीराज पाटील यांनाही राजकारणात यशस्विपणे लाँच केले आहे. पृथ्वीराज पाटील यांनी सरपंचपदाच्या निवडणुकीत आमदार संजय शिंदे गटाचे नितीन खटके यांचा तब्बल १,३२९ मतांनी पराभव करत राजकारणात दमदार एन्ट्री केली आहे.


करमाळा तालुक्यातील जेऊर ग्रामपंचायतीवर माजी आमदार नारायण पाटील यांची १९९२ पासून म्हणजे तब्बल ३० वर्षांपासून निर्विवाद वर्चस्व असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. ते मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे समर्थक आहेत. सरपंचपदाच्या निवडणुकीत पाटील यांचे चिरंजीव पृथ्वीराज पाटील हे निवडून आले आहेत. पृथ्वीराज पाटील यांनी जेऊर ग्रामपंचायतीच्या माध्यमातून राजकारणात प्रवेश झाला आहे.दरम्यान, शिंदे गटाचे माजी आमदार नारायण पाटील यांनी जेऊरसह राजुरी, केम, कंदर, चिखलठाण, कावळवाडी, भगतवाडी, रायगाव या ग्रामपंचायतींत विजय मिळाल्याचा दावा केला आहे. मात्र, स्थानिक आघाड्यांच्या माध्यमातून ग्रामपंचायतीची निवडणूक लढविण्यात आल्याचेही पाटील यांच्याकडून सांगण्यात आले.

## रागाचा पारा चढला बापाच्या हातून खुनाचा गुन्हा घडला

▸ दारुसाठी पैसे मागणाऱ्या मुलाला बापाने संपवले
▸ खुनी बापास दोन दिवसांची पोलीस कोठडी

सुराज्य/सोलापूर

वारंवार दारूसाठी पैसे मागून वडिलांना त्रास देणाऱ्या मुलाचा चिडलेल्या वडिलांनी धारदार शस्त्राच्या साह्याने मुलाच्या शरीरावर अनेक ठिकाणी वार करून त्याला यम सदनी पाठवले.



अंगावर काटा आणणारी ही घटना एफ ग्रुप लक्ष्मी चौक जुना विडी घरकुल या परिसरात रात्री घडली.

मयत श्रीनिवास मल्लय्या यासम (वय-३२) याला दारूचे व्यसन होते.वडील मल्लय्या आगय्या यासम (वय-६२) हे पत्नी,दोन मुले, सुना, नातवंडांसह जुना विडी घरकुल येथे राहतात.उदरनिर्वाहासाठी ते घरगुती टेलरिंग काम करतात.धाकटा मुलगा श्रीनिवास यास दारूचे व्यसन होते. त्याचे लग्न झाले असून,त्याला लहान बाळ आहे,परंतु गेल्या अनेक वर्षापासून श्रीनिवास हा दारूच्या व्यसनामुळे घरात नेहमी तो आई-वडिल व बायकोला मारहाण करत असे. तसच वडील यास वारंवार दारूसाठी पैसे मागून भांडण काढत असे.घटनेच्या दिवशी सोमवारी (काल) रात्री सहा वाजण्याच्या सुमारास नेहमीप्रमाणे श्रीनिवास यांनी वडील मल्लय्या यांच्याकडे दारू पिण्यासाठी पैसे मागितले. यावेळी-वडिलांनी विरोध केला असता श्रीनिवास हा ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हता.त्यामुळे चिडून जाऊन वडिलांनी किचन मधून चाकू आणून मुलगा श्रीनिवास यांच्या गळ्यावर, डाव्या डोळ्याच्या खाली, उजव्या हाताच्या दंडावर व मानेवरील मागील बाजूस चाकूने जोरदार वार करून गंभीर दुखापत केली.बेशुद्ध अवस्थेत भाऊ विनायक यांनी त्यास उपचाराकरिता शासकीय रुग्णालयात दाखल केले.परंतु गळ्यावर मोठी गंभीर जखम झाल्याने उपचारादरम्यान तो मयत झाला. या घटनेची नोंद व्हील पोलीस चौकी झाली आहे.

**रागाचा पारा चढला....**

श्रीनिवास यास दारूचे व्यसन जडले असल्यापासून तो कोणतेही काम करत नसे, सकाळ संध्याकाळ तो पैशासाठी वडिलांना तगादा लावत असे. त्याच्या या वारंवार होणाऱ्या तगाद्यामुळे वडीलही चिडून होते. घटनेच्या दिवशी खरे तर मुलाला मारहाण करायची नव्हती परंतु राग अनावर झाला आणि वडिलांच्या हातून असे कृत्य घडले.

## घर फोडून पाच लाख पळवले

**सोलापूर :** मुलीच्या लग्न कार्यासाठी लागणारे साहित्य खरेदी करण्यासाठी हैदराबाद येथे गेल्यानंतर चोरट्यांनी घर फोडून पाच लाख १४ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला आहे.


ही घटना होटगी रस्त्यावरील कल्याणनगर भाग-३ येथे घडली. याबाबत भाग्यलक्ष्मी पिडगूलकर (वय ४२, रा. कल्याण नगर भाग ३) यांनी फिर्याद दिली. फिर्यादी पिडगुलकर या त्यांच्या मुलीच्या लग्नकार्यासाठी हैदराबाद येथे गेल्या होत्या. त्यामुळे फिर्यादीचा भाऊ व भावजय यांना त्यांनी घरी ठेवले होते. परंतु फिर्यादीचे नातेवाईक मरण पावल्याने त्यांचा भाऊ व भावजय हे देखील अंत्यविधीसाठी बाळीवेस येथे गेले होते. त्यावेळी ही चोरीची घटना घडली. तपास फौजदार पोपळघट हे करीत आहेत.

## घर भाड्यावरून पत्नीच्या डोक्यात घातली फरशी

सुराज्य/सोलापूर

रामवाडी भागातील न्यू धोंडीबा वस्ती येथे घरभाड्याच्या कारणावरून पत्नीच्या डोक्यात फरशी घालून तिला जखमी केल्याबद्दल पतीविरुद्ध सलगर वस्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

पत्नी गौसिया मेहताब शेख (वय ४०, न्यू धोंडीबा वस्ती) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पती मेहताब अब्बास शेख (रा. नई जिंदगी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. न्यू धोंडीबा वस्ती येथे फिर्यादी ही बहिणीच्या घरी गेली असता पती मेहताब हा तेथे आला व त्याने फिर्यादीस मालकिणीला घरभाडे किती द्यावयाचे आहेत असे विचारले असता फिर्यादीने त्याला माझ्याशी बोलू नका, मालकिणीला जाऊन विचारा असे सांगितले त्या कारणावरून चिडून पतीने पत्नीला शिवीगाळ व लाथा बुक्क्याने मारहाण केली. त्यावेळी फिर्यादीची बहीण आऐशा सलमान शेख ही भांडण सोडवण्यासाठी आली असता तिला देखील मारहाण करण्यात आली. त्यावेळी पतीने फरशीच्या तुकड्याने पत्नीच्या डोक्यात मारून जखमी केले आहे. तपास पोलीस हवालदार कदम करीत आहेत.



## सांगोला येथे कोयत्याने मोटारीची काच फोडून ५१ हजार रुपये लुटले

सुराज्य/सोलापूर

उसने दिलेले पैसे वसूल करून मोटारीतून येत असताना अनोळखी चोरट्याने कोयत्याने मोटारीची काच फोडून तसेच डोळ्यात तिखट टाकून ५१ हजार ५०० रुपयाची रोकड लुटून पोबारा केला.

**चौघांवर दरोड्याचा गुन्हा**

ही घटना सांगोला येथील सोमेवाडी चौक ते पाचेगाव पाटीकडे जाणाऱ्या रस्त्यावर रविवारी सकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणात सांगोल्याच्या पोलिसांनी मोटारीतून आलेल्या चौघां अनोळखी चोरट्याविरुद्ध दरोड्याचा गुन्हा दाखल केला आहे. या संदर्भात सादीक मैनुद्दीन पठाण (वय ३१ रा.घेरडी ता.सांगोला) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. ते काल सकाळी त्यांच्या चौघां मित्रासोबत मोटारीतून कोळा येथे चंद्रकांत वाघमारे यांचे पैसे आणण्यासाठी गेले होते. कोळा गावातून पैसे घेतल्यानंतर सर्वजण त्याच मोटारीतून सांगोल्याचा दिशेने निघाले होते. सकाळी ११ वाजेच्या ते पाचेगाव पाटीजवळ आले असता ओमीनी मोटारीतून आलेल्या चौघांनी त्यांची मोटर अडविली. त्यापैकी एकाने पठाण यांच्या मोटारीची काच कोयत्याने मारू फोडली. तर दुसऱ्याने त्यांच्या तोंडावर चटणी टाकली. आणि चंद्रकांत वाघमारे यांना कोयत्याने ठार मारण्याची धमकी देऊन त्यांच्या हातातील रोख रकमेची पिशवी घेऊन सोमेवाडीच्या दिशेने मोटारीतून पसार झाले. असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास सहाय्यक निरीक्षक खरात करीत आहेत.

## तेरा लाखांची फसवणूक; तरुणावर गुन्हा

सुराज्य/सोलापूर

ग्राहकांनी ऑनलाईन खरेदी केलेल्या वस्तूंची रक्कम कंपनीच्या बँक खात्यावर जमा न करता स्वतः जवळ ठेवून कंपनीची फसवणूक केल्याप्रकरणी तरुणाविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सुजितकुमार अशोक बिराजदार (वय-३१, सुलेरजवगे, ता.अक्कलकोट) असे तरुणाचे नाव आहे. या प्रकरणी ईश्वर नवनाथ शिंदे (वय-२९, भुसेवस्ती) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. ही घटना दि.३१ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर दरम्यान घडली. फिर्यादी हे एनटेक्स ट्रान्सपोर्टेशन प्रा.लि.पुणे या कंपनीत एरिया मॅनेजर म्हणून काम पाहतात. वरील संशयित आरोपी बिराजदार हा कंपनीमध्ये सुपरवायझर म्हणून काम करतो. ॲमेझॉन ऑनलाइन शॉपिंग केलेल्या लोकांचा माल हा बाळे येथील ऑफिसमध्ये येत असून, तो पुढे सोलापूर शहरात त्या ऑनलाइन शॉपिंग केलेल्या साहित्याचे वाटप करण्यासाठी बिराजदार यांच्या हाताखाली काम करणारे डिलिव्हरी बॉय हे ऑनलाइन शॉपिंगचे वस्तू देऊन मिळालेले पैसे याच्याकडे जमा करत. परंतु बिराजदार याने त्याच्याकडे जमा केलेले रक्कम ती कंपनीच्या बँक खात्यावर जमा न करता स्वतःजवळ ठेवून कंपनीची १३ लाख ८० हजार ९९० रुपयांची फसवणूक केली आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



त्यांच्या घरी स्वच्छता सुरु झाली की ते इथे' आनंदाने येतात !

कल्याण
269-74-167

मुंबई
246-29-199


## तोफ धडाडली... संघर्ष पेटणार!

### 'करो या मरो'ची लढाई, लढेंगे और जितेंगे

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या मागणीवरून मराठा आरक्षणाचे आंदोलक आणि ओबीसी वर्ग यांच्यात मोठा संघर्ष पेटण्याची चिन्हे दिसत आहेत.

ओबीसी चळवळीचे ज्येष्ठ नेते तथा महायुतीच्या सरकारमंधील मंत्री छगन भुजबळ यांची तोफ सोमवारी धडधडली. जमेल त्या मार्गाने सरसकट कुणबी प्रमाणपत्राला विरोध करा, मोर्चे काढा, आंदोलन करा, साखळी उपोषण करा. जमेल त्या मार्गाने ओबीसी आरक्षण वाचवण्यासाठी प्रयत्न करा, अशी हाक देतानाच भुजबळांनी ओबीसींना एकवटण्याचे आवाहन केले. मराठा आंदोलकांच्या बुलडोझरमधून ओबीसी वाचणार नाहीत, आता 'करो या मरो'ची लढाई होईल, असा खणखणीत इशाराही त्यांनी दिला.भुजबळांच्या या विधानांना मनोज जरांगे पाटील यांनी जशास तसे उत्तर दिले आहे. 'लढेंगे और जितेंगे' हा आमचा निर्धार आहे, असा प्रतिइशारा जरांगे यांनी दिल्यामुळे आता मराठा आणि ओबीसी यांच्यातील संघर्ष चिघळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.



**लढेंगे आणि जितेंगे... :** कुणबी नोंदी असलेल्या मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याची तयारी राज्य सरकारने दर्शविली होती. या मुद्द्यावरुन भुजबळ हे नाराज असल्याची माहिती आहे. सोशल मीडियावर त्यांची एक कथित ऑडिओ क्लीप व्हायरल झाली. या ऑडिओ क्लीपमध्ये ऐकायला मिळत असलेल्या संभाषणावरुन छगन भुजबळ हे आगामी काळात ओबीसी प्रवर्गात नवे वाटेकरी निर्माण होऊ देण्यास विरोध करतील, असे संकेत मिळत आहेत. या पार्श्वभूमीवर जरांगे पाटील यांनी सोमवारी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. 'करेंगे या मरेंगे' हा त्यांचा प्रश्न आहे. आमचे वाक्य 'लढेंगे आणि जितेंगे' आहे. आम्ही अतिक्रमण केले नाही,असे जरांगे-पाटील म्हणाले.

**आता 'करो या मरो'ची लढाई :** राज्यात मराठा आरक्षणावरुन पेटलेले वातावरण आता कुठे शांत होत असतानाच आता ओबीसी समाज आक्रमक होण्याची शक्यता आहे. भुजबळ हे ओबीसी आरक्षण वाचवण्यासाठी लढा उभारु शकतात, असेही या कथित ऑडिओ क्लीपवरील संभाषणातून स्पष्ट होत आहे. मात्र, अद्याप छगन भुजबळ यांनी याविषयी कोणतेही ठोस स्पष्टीकरण दिलेले नाही. करो या मरोचा इशारा भुजबळांनी दिल्यामुळे आगामी काळात मराठा विरुद्ध ओबीसी असा संघर्ष उभा राहणार का, हे पाहावे लागेल.

▸ वार्षिक क्रमावारी; पुणे विभागात

## पंढरपूर बाजार समितीचा चौथा क्रमांक

सुराज्य/पंढरपूर

बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पांतर्गत पणन संचालनालय, पुणे यांनी सन २०२२-२०२३ साठी वार्षिक क्रमवारी जाहीर केली. यामध्ये पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीने १४६.५ गुणांसह पुणे विभागातून चौथा तर राज्यस्तरावर १२ वा क्रमांक पटकावला आहे, अशी माहिती पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती हरीष गायकवाड आणि उपसभापती राजुबापू गावडे यांनी दिली आहे.




**वार्षिक क्रमवारीत राज्यस्तरावर बारावा क्रमांक**

यासाठी प्रकल्प अंमलबजावणी कक्षाच्यावतीने राज्यातील बाजार समित्यांची वार्षिक क्रमवारी घेण्यात आली. त्यानुसार राज्यातील बाजार समित्यांची तालुका, जिल्हास्तरीय समितीने पडताळणी केलेले बाजार समित्यांचे क्रमवारीचे प्रस्ताव संबंधीत जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्या कार्यालयाकडून पणन संचालनालय कार्यालय, पुणे यांच्याकडे प्राप्त झाले होते.

गुणांकन पद्धतीनुसार प्राप्त झालेल्या गुणांकनाच्या आधारे राज्यातील ३०५ बाजार समित्यांची सन २०२२ - २०२३ या वर्षाची वार्षिक क्रमवारी जाहीर करण्यात आली. पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीने पायाभूत सुविधा, इतर सेवा सुविधा, आर्थिक कामकाज, वैधानिक कामकाज व इतर निकषांमध्ये पात्र ठरत १४६.५ गुण प्राप्त केले. सन २०२१-२०२२ सालामध्ये कृषी उत्पन्न बाजार समितीचा राज्यस्तरीय ३१ वा क्रमांक होता.

# आत्मचिंतन होईल?

मराठा आरक्षणाच्या संदर्भात एक विस्फोटक माहिती समोर आली आहे. माँसाहेब जिजाऊ यांचे वंशज असणारे नामदेवराव जाधव यांनी आरक्षणाविषयीचे वास्तव समोर आणले आहे. एका व्हिडिओच्या माध्यमातून ते वास्तव सोशल मीडियावर टाकण्यात आले आहे. स्वतः जाधव यांनी हे वास्तव सांगितले आहे. सनावळी आणि आरक्षणाच्या टक्केवारीची आकडेवारी त्यांनी नमूद केली आहे. मराठा आरक्षणाचा आपल्याच नेत्याने खून केल्याची खंत त्यांनी व्यक्त केली आहे. त्यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे उघडपणे नाव घेऊन त्यांच्यावरच जोरदारपणे शाब्दिक हल्ला चढवला आहे. त्यामुळे समाजात खळबळ माजणे साहजिकच आहे. मराठा आरक्षणाचा प्रश्न गेल्या काही महिन्यांपासून चांगलाच चर्चेत आहे. मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे-पाटील यांनी उपोषण सुरू केल्यानंतर त्यांना पाठिंबा देण्यासाठी राज्यभर आंदोलने झाली. त्याला हिंसक वळणही लागले. अनेक ठिकाणी जाळपोळ आणि दगडफेकही झाली. आरक्षण म्हणजे किराणा दुकानातील माल नाहीच हे जाणकारांनी सांगितले. कायद्याच्या चौकटीत आरक्षण बसवण्यासाठी वेळ लागेल, असे सरकारकडून सांगितले गेले पण जरांगे-पाटील आपल्या उपोषणाशी ठाम होते. मात्र, दोन निवृत्त न्यायाधीशांनी आरक्षणातील कायदेशीर नऊ त्रुटी समोर ठेवल्यानंतर जरांगे-पाटलांनी उपोषण सोडले. दोन महिन्यात आता सरकार काय करणार हे पाहायला सारे राज्य उत्सुक आहे. राज्यभर दौरा करण्याचा निर्णय घेऊन जरांगे हे आता पुन्हा सहानुभूती मिळवायला लागतील. अशा स्थितीत जाधवांनी आरक्षणाविषयीची जुन्या काळातील माहिती समोर आणून मराठा नेते आणि आंदोलकांच्या डोळ्यात जळजळीत अंजन घातले आहे, असे म्हणावे लागेल. मराठा आंदोलनावर सगळी चर्चा सुरू असतानाच जिजाऊंचे वंशज प्रा. जाधव यांनी शरद पवारांमुळे मराठा आरक्षण गेले, अशा सडेतोड शब्दात पवारांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करून टाकले आहे. पवारांनी मराठ्यांच्या हक्काचे आरक्षण घालवले. जे मराठे यादीत १८१ क्रमांकावर होते. त्यावर फुली मारली गेली आणि १८२ क्रमांक तसेच १८३ क्रमांकावर अनुक्रमे तेली आणि माळी होते. त्यांना आरक्षणात घेतले गेले. ओबीसींची पहिली यादी जेव्हा तयार झाली, त्यात १८० जाती होत्या. सुधारित यादीत १८१ क्रमांकांवर मराठा, १८२ क्रमांकावर तेली तर १८३ ला माळी होते. मग क्रमांक १८१ गायब कसा झाला? जे आरक्षण ११ टक्के होते ते १४ टक्के झाले तेव्हा लेव्हा पाटील, लेव्हा कुणबी आणि लेव्हा पडीदार या तीन जातींचा समावेश केला. तेव्हा त्यांची कुठली कागदपत्रे घेतली गेली होती? कोणते आर्थिक किंवा सामाजिक निकष सिद्ध झाले होते? शरद पवार मुख्यमंत्री असताना त्यांनी हे आरक्षण १४ वरून २७ टक्क्यांवर नेले मात्र, त्यावेळी मराठ्यांना डावलून तेली आणि माळी या दोन जातींचा समावेश केला. पवारांनी तेली आणि माळी जातींचा ओबीसींमध्ये समावेश केला. आमची त्याला काही हरकत नाही. पण मग त्यांचं शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक मागासलेपण का पाहिले गेलं नाही? पवार हे मुख्यमंत्री असताना जे काही घडले त्याच्या चौकशीसाठी श्वेतपत्रिका काढावी. २३ मार्च १९९४ हा मराठ्यांसाठी 'काळा दिवस' ठरला आहे. याचे महत्त्वाचे कारण त्याच दिवशी शरद पवारांनी रातोरात १८१ क्रमांक खोडून इतर दोन जातींचा समावेश ओबीसींमध्ये केला. डेस्क ऑफिसरच्या सहीने दोन जाती ओबीसींमध्ये घेतल्या गेल्या. त्यांना तातडीने १४ टक्के आरक्षणही दिले गेले आणि त्यानंतर नोकरभरतीही झाली. ओबीसींच्या यादीत तेली आणि माळी समाज घेतल्यानंतर २३ मार्च १९९४ पासून आत्तापर्यंत ज्यांना नोकऱ्या मिळाल्या त्यावर मराठ्यांच्या मुलांचा हक्क होता. आज मराठ्यांची लाखो मुले बेरोजगार आहेत, त्याला कारण हा रातोरात झालेला हा निर्णय आहे. या निर्णयाला शरद पवार जबाबदार आहेत. कारण ते मुख्यमंत्री असताना हा निर्णय घेण्यात आला आहे, असा जाधवांचा आरोप आहे. पुरोगामी आहोत हे दाखवण्यासाठी पवारांनी मराठ्यांचे भविष्य गाडल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. पवारांनी हा निर्णय नेमक्या कोणत्या दबावाखाली घेतला? त्यांच्यापुढे कोणत्या अडचणी होत्या? असे जाधवांचे सवाल आहे. लोकशाहीच्या व्यवस्थेत दुसरी बाजूही महत्त्वाची असते. आम्ही म्हणतो तेच खरे, असे चालत नाही. आरक्षणाविषयी जे जे लोक बोलले, त्यांच्यावर हल्ला केला गेला. आता जाधवांनी जे वास्तव मांडले आहे, त्यावर आत्मचिंतन होणार काय? हाच खरा प्रश्न आहे.




## सामाजिक

# विद्यापीठाचा नामकरण लढा

नामांतर, नामविस्तार आणि नामकरण राजकीय इच्छाशक्तीच्या जोरावर राजकारणी जनतेला झुलवत किती दिवस ढकलायचं हे ठरवत असतात. आम्ही प्रथम समाजकारण नंतर राजकारण करतो, अशा गप्पा मारणारे प्रत्येक निर्णय राजकीय सूडबुद्धीनेच घेत असतात. एखाद्या शहराचा, विमानतळाचा, चौकाचा, विद्यापीठाचा, उड्डाणपुलाचा नामांतर कोणत्याही वादाशिवाय सहजासहजी झालाच नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा नामविस्तार होण्यासाठी १४ वर्षांचा संघर्ष करावा लागला. त्यासाठी मोर्चे, निदर्शने, उपोषण, जेलभरो आंदोलने झाली. कोणी शहीद झाले, कोणी नामांतरवादी नेते म्हणून उदयास आले, तर कोणाच्या कारकिर्दीची नेता म्हणून सुरुवात आंदोलनाने केली. नामांतरासाठी इतकी वर्षे सतत सुरू असलेला हा लढा जागतिक इतिहासात नोंद घेण्यासारखा आहे. नवी मुंबई विमानतळाला नाव देण्यावरून राजकीय पक्षांनी शक्तिप्रदर्शन करून आपापली ताकद दाखवली. उत्तर प्रदेशमध्ये मायावतींचे सरकार बहुमतात असताना त्यांनी सत्तेच्या जोरावर शहरांचे, जिल्ह्यांचे, पार्कचे महापुरुषांच्या नावाने नामांतर केले. औरंगाबाद शहराचं छत्रपती संभाजी नगर' नामांतर होण्यासाठी सत्ताबदल आडवं आल्याने श्रेयवादाने उशीर झाला. नामांतर करताना ज्या व्यक्ती, महापुरुष, समाजसुधारक, संतांचं नाव दिलं जातं ते व्यक्तिमत्त्व, मोठेपणा, त्यांचे कर्तृत्व त्या क्षेत्राशी संबंधित असूनसुद्धा केवळ आपला-परका असा भेदभाव करूनच निर्णय घेतला जातो.

समाज प्रबोधन, परिवर्तनासाठी सामाजिक क्रांती करणारे जोतिबा-सावित्री यांची कर्मभूमी आणि शिक्षणाचा पाया रोवलेल्या पुण्यात सावित्रीबाई फुलेंनी भारतीय स्त्री शिक्षणासाठी शेण, दगड, मातीचा मारा खाल्ला, पण शिक्षणाचा आग्रह सोडला नाही. त्यांच्यामुळेच दलित, बहुजन शिक्षण घेऊ शकले, नाहीतर अधोगतीच होती. मती, गती, नीती, वित्त जाऊन अनर्थच. त्याच सावित्रीबाईंचं नाव पुणे विद्यापीठाला देतानासुद्धा अर्ज-विनंती केल्यानंतर लगेचच दिलं असं नाही. डॉ. गौतम बेंगाळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांना संघर्ष करावा लागला. त्या संघर्षाचे साक्षीदार असणारे आंदोलनकर्ते धनंजय धेंडे यांनी लिहिलेला सविस्तर वृत्तांत म्हणजे पुणे विद्यापीठाच्या नामकरणाचा प्रेरणादायी इतिहास'. अर्थात हे पुस्तक म्हणजे संपूर्ण नामांतर प्रक्रियेचं दस्तऐवज आहे. डॉ. गौतम बेंगाळे पुरंदर तालुक्यातील घेरापानवडी येथे जन्मलेले बी. एम. सी. कॉलेजचे क्रियाशील, उत्साही प्राध्यापक आणि लेखक. घेरापानवडी येथे २५० एकर जागेत उभारणाऱ्यात येणाऱ्या आंतरराष्ट्रीय विद्यापीठाचे संस्थापक. पुणे विद्यापीठात डॉ. गौतम बेंगाळे आपला पीएचडीचा प्रबंध सादर करीत असताना त्यांच्या मनात एक विचार आला. पुणे विद्यापीठाचे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ असे नामकरण का करू नये? आणि नामकरणाच्या प्रवासाला सुरुवात झाली. प्रवास अत्यंत कठीण होता. सुरुवातीला डॉ. बेंगाळे यांनी 'वन मॅन शो'प्रमाणे आंदोलनाला सुरुवात केली. मोर्चा काढला, आमरण उपोषण केलं. उपोषण करत असताना त्यांनी जिवाची पर्वा केली नाही.

**समाज प्रबोधन, परिवर्तनासाठी सामाजिक क्रांती करणारे जोतिबा-सावित्री यांची कर्मभूमी आणि शिक्षणाचा पाया रोवलेल्या पुण्यात सावित्रीबाई फुलेंनी भारतीय स्त्री शिक्षणासाठी शेण, दगड, मातीचा मारा खाल्ला, पण शिक्षणाचा आग्रह सोडला नाही. त्यांच्यामुळेच दलित, बहुजन शिक्षण घेऊ शकले, नाहीतर अधोगतीच होती. मती, गती, नीती, वित्त जाऊन अनर्थच. त्याच सावित्रीबाईंचं नाव पुणे विद्यापीठाला देतानासुद्धा अर्ज-विनंती केल्यानंतर लगेचच दिलं असं नाही. डॉ. गौतम बेंगाळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांना संघर्ष करावा लागला. त्या संघर्षाचे साक्षीदार असणारे आंदोलनकर्ते धनंजय धेंडे यांनी लिहिलेला सविस्तर वृत्तांत म्हणजे पुणे विद्यापीठाच्या नामकरणाचा प्रेरणादायी इतिहास.**




पुणे विद्यापीठाची स्थापना स्वातंत्र्यसैनिक आदरणीय बॅरिस्टर मुकुंदराव रामराव जयकर यांनी खूप परिश्रम घेऊन केली. विद्यापीठाच्या उभारणीसाठी आयुष्यातील दहा वर्षे त्याग करून विद्यापीठाचा नावलौकिक वाढवला. पुण्यातील अनेक विद्यार्थ्यांची मुंबईत जाऊन शिक्षण घेण्याची गैरसोय दूर केली. विद्यापीठ स्थापन करून पुणे विद्यापीठाच्या पहिल्या कुलगुरुपदाची सूत्रे सांभाळणे ही अतिशय गौरवाची बाब आहे. त्याच पुणे विद्यापीठाला सावित्रीबाई फुले यांचे नाव द्यावे असा विचार डॉ. गौतम बेंगाळे यांच्या मनात यावा ही विशेष अभिमानाची बाब आहे. यावरून त्यांची आत्मीयता, जिद्द आणि तळमळ दिसून येते.

९ सप्टेंबर २०११ रोजी पाथर्डी, अहमदनगर येथे डॉ. गौतम बेंगाळे यांनी महिला मंडळाच्या कार्यक्रमात वक्ता म्हणून बोलताना त्यांच्या मनात अनेक महिन्यांपासून घोळत असलेल्या विचारांना भाषणात वाट मोकळी करून दिली. श्रोत्यांना उद्देशून म्हटले, पुण्यात १८४८ मध्ये महात्मा फुल्यांनी मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली आणि पुणे विद्यापीठाची स्थापना १९४८ साली झाली. म्हणजेच महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी हे कार्य १०० वर्षे आधीच केले होते. त्यामुळे पुणे विद्यापीठाच्या स्थापनेच्या वेळेसच पुणे विद्यापीठाला सावित्रीबाई फुले यांचे नाव द्यायला हवे होते. श्रोत्यांमधून बरोबर आहे असा प्रतिसादात्मक आवाज आला आणि डॉ. बेंगाळे यांनी विचार मंचावरूनच पुणे विद्यापीठाला सावित्रीबाईंचे नाव द्यावे' अशी घोषणा केली. पुणे विद्यापीठाच्या नामांतरासाठी कृती समिती स्थापन करण्यात आली. त्या कृती समितीतील ज्येष्ठ मान्यवरांनी डॉ. बेंगाळे यांची निमंत्रक म्हणून एकमताने निवड केली आणि संघर्षाला सुरुवात झाली.

पुणे विद्यापीठाला सावित्रीबाई फुले यांचे नाव दिलेच पाहिजे यासाठी २० ऑक्टोबर २०११ रोजी भारताच्या राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांना डॉ. बेंगाळे यांनी स्वहस्ताक्षरात पहिले पत्र लिहिले. प्रतिभाताई पाटील यांनी सकारात्मक पत्र लिहून सावित्रीबाई फुले यांचे नाव पुणे विद्यापीठाला दिले पाहिजे अशी नोंद केली. त्यानंतर डॉ. बेंगाळे यांनी महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल, मुख्यमंत्री, विधान परिषद सदस्य, विधानसभा सदस्य, सर्व कॅबिनेट मंत्री, राज्यमंत्री व महाराष्ट्रातील ४५० सामाजिक चळवळीतील संघटनांना पत्रव्यवहार केला. डॉ. बेंगाळे यांच्या प्रमुख नेतृत्वाखाली पुणे विद्यापीठाला सावित्रीबाई फुले यांचे नाव द्यावे या मागणीसाठी दिनांक १४ डिसेंबर २०११ रोजी पुण्यामध्ये समता भूमी, महात्मा फुले यांच्या वाड्यापासून ते पुण्यातील जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत प्रचंड मोर्चा काढून यशस्वी केला.

१० मार्च २०१२ रोजी डॉ. गौतम बेंगाळे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले. कुलगुरू, पुणे विद्यापीठ, मुख्यमंत्री यांच्या समवेत नामकरणासंदर्भात सकारात्मक चर्चा झाल्याने शासनाच्या विनंतीवरून डॉ. गौतम बेंगाळे यांनी सातव्या दिवशी आमरण उपोषण सोडले. डॉ. गौतम बेंगाळे नवी मुंबई, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सोलापूर, सांगली, सातारा, नाशिक, अमरावती, लातूर, अकोला इत्यादी ठिकाणी कार्यक्रमांना, संमेलनांमध्ये उपस्थित राहून भाषणातून नामकरणाची भूमिका मांडत होते. .विधानसभा, विधान परिषदेने विषय घेतला पाहिजे. यासाठी समितीच्या वतीने पाठपुरावा केला. कृती समितीचे निमंत्रक डॉ. गौतम बेंगाळे यांनी केलेल्या विद्यापीठातील कॅम्पसमधील धरणे आंदोलनाला यश आले व विधानसभेत ठराव मंजूर करून घेण्यात आला. सुधीर मुनगंटीवार (विधानसभा), विनोद तावडे (विधान परिषद) यांनी संबंधित ठराव मंजूर करून मान्य केले, परंतु फेब्रुवारी २०१४ पासून लोकसभेची आचारसंहिता सुरू झाली. लोकसभा निवडणुका पार पडल्या. केंद्रातील सरकार बदलले. राजकीय परिस्थितीत बदल झाला. नामकरणासंदर्भात प्रश्नचिन्ह

नामकरणाचा प्रेरणादायी इतिहास पुस्तकरूपाने प्रकाशित केल्याने धनंजय धेंडे यांनी वाचकांची सोय केली आहे. या पुस्तकात भारताच्या राष्ट्रपतींना लिहिलेले पत्र, मुख्यमंत्री, इतर मंत्र्यांना, आमदार, खासदार यांना लिहिलेली पत्रे जशीच्या तशी छापली असून आंदोलन काळात वर्तमानपत्रांनी ज्या बातम्या प्रसिद्ध केल्या आहेत त्याही वाचायला मिळतात. हे पुस्तक वाचून अनेकांना ऊर्जा आणि प्रेरणा मिळेल. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या साहित्यिका आयदानकार उर्मिलाताई पवार यांनी अत्यंत मार्मिक शब्दांत प्रस्तावना लिहिली आहे.

लेखक धनंजय धेंडे यांनी लिहिलेल्या 'पुणे विद्यापीठाच्या नामकरणाचा प्रेरणादायी इतिहास' या पुस्तकाला साहित्यिक मूल्य किती? याचं मूल्यमापन करण्यापेक्षा इतिहासाच्या दृष्टीने केलेली मांडणी अधिक महत्त्वाची असून आंदोलनाची नोंद व्हावी या अर्थाने याला विशेष महत्त्व आहे.

**- प्रदीप जाधव.**

## टुडेज् ब्लॉग

**लहान मुलांचा सर्वात प्रिय सण दिवाळी असतो. त्यास कारणही अनेक असतात. सर्व सणांपेक्षा सुट्ट्या जास्त असतात. मामाच्या व अन्य गावाला जाण्याची संधी असते. नवीन नवीन कपडे फटाके आवडीचे पदार्थ रोषणाई हे सर्व दिवाळी सणाच्या निमित्त मुलांना मिळते. त्यामुळे लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांचीच खरेदी सणानिमित्त केली जाते. हा सण स्नेहाचा ज्योतीने ज्योत ठेवण्याचा. प्रकाश वाटेने पुढे जाण्याचा. दिवाळीचे आणखीन वैशिष्ट्य म्हणजे लहान तसेच युवक महिला यासाठी प्रकाशित होणारे विविध दिवाळी अंक खरंतर एक बौद्धिक बौद्धिक फराळच असते. ज्याप्रमाणे दिवाळी फराळामध्ये चिवडा, चकली, लाडू, करंजी असे वैविध्य पदार्थ असतात. तसेच या अंकात देखील कथा, कविता, लेख, उपक्रम, कोडी असे विविधता असते. असा वैविध्यपूर्ण बौद्धिक फराळ किशोर मासिकात आपणास मिळतो.**

# जीवन कौशल्याची पणती : किशोर

एकमेकांच्या सहकार्याने रंगकाम करणारे मुले तेही एकाच्या खांद्यावर तर एक जण शिडीला आधार तर तिसरा निरीक्षण करणारा आहे, असा बोध चंद्रमोहन यांनी रेखाटला आहे. संपादक किरण केंद्रे यांनी हा दिवाळी अंकात जीवन कौशल्य या विषयाला केंद्रस्थानी ठेवून तयार केला आहे. त्याकरिता ॲमेझॉनच्या जंगलातला चाळीस दिवस या कथेतील चार लहान मुले विमान अपघात जिवंत राहतात. ती त्यांच्या आधीच्या पिढीने त्यांना लहानपणापासून मिळालेल्या जीवन कौशल्याच्या शिकवणीमुळेच. त्यामुळेच मुलांनी लहान वयातच जीवन कौशल्ये शिकून घेणे आवश्यक आहे. बुद्धिमत्ता आणि कल्पनाशक्ती मूलभूत जीवन कौशल्याचा जोड देण्याची गरज आहे. नवीन शैक्षणिक धोरण विविध विषयांच्या ज्ञानालाच नव्हे तर जीवन कौशल्य विकासास महत्त्व देण्यात आले आहे .




मुखपृष्ठाच्या पाठीमागे प्रवीण दवणे यांची तो चंद्र लाभला ही कविता आहे. अखंड अविरत ध्यास निरंतर, चंद्र दरेतील मिठवी अंतर अशी ओळ आहे यातून अशक्य काहीच नसते जर प्रयत्न असतील तर सर्व शक्य आहे असा संदेश दिला आहे. त्यानंतर कवी गुलजार यांची अंबरीश मिश्रा यांनी अनुवादित केलेली बाबा आणि बाबाची काठी ही कविता आहे. लहान मुलांना आजी आजोबा खूप आवडतात. तोच धागा पकडून अगदी सोप्या भाषेत, काठी सोबतचे आजोबाचे चित्र रेखाटले आहे इडा पिडा सर्व टळू दे, पुन्हा बळीराजाचे राज्य येऊ दे असे म्हणत गड्या रे रूप घेऊनी नवे ही प्रदीप आवटे यांची कविता देखील मुलांना नक्कीच आवडेल. दासू वैद्य यांच्या चांदणी कवितेमध्ये मुलगी आणि आईमधील संवाद व्यक्त झाला आहे.

शाळेमध्ये जशी संस्कार करिता प्रार्थना परिपाठामध्ये महत्त्वाचे असते. तसेच एक प्रार्थना संतोष पवार यांची आहे. गावाकडच्या शेत शिवाराची माहिती आहे. तर बाटलीत अडकलेला मासा या कवितेत माशाची होणारी गंमत दिली आहे. शेवटी कंदील लावू लाखो रुपेरी तारांना थोडे झिजवू अशी भावना मांडणारी शुभ दीपावली कविता आहे. यावरून वय वर्ष नऊ वर्षापासून सर्वांना समजातील आवडतील अशा आशय घन कविता या वर्षी किशोर अंकात आहेत. जंगलातील धाडस या कथेमध्ये मोठ्या माणसांना सांगितला शिवाय नवीन ठिकाणी जाऊ नये असा संदेश तसेच प्रत्यक्ष जंगलात मातीच्या पणत्या सोबत किशोरच्या जीवन कौशल्य रूपी पणती घरी घेऊन या दिवाळीस घेऊन येऊ या.

**- अमोल भोसले, सोलापूर.**

## जन्म हा अखेरचा

# आत्मस्थल - ३



अज्ञानामुळे आत्मा स्वत:चे व्यापक स्वरुप विसरतो आणि स्वत:ला संकुचित देह समजू लागतो. मग त्याच्याकडून शुभाशुभ कर्मे घडतात. शुभाशुभ कर्मांना शास्त्रात विहित कर्म आणि निषिद्ध कर्म अशी नावे आहेत. जी कर्मे करा, असे शास्त्र सांगते, ते विहित कर्म आणि जे करु नका असे शास्त्र सांगते ते निषिद्ध कर्म होय. विहित कर्माचरणामुळे पुण्यप्राप्ती होते तर निषिद्ध कर्माचरणाने पाप होते. पुण्य-पापानेच मनुष्याच्या जीवनाची दिशा निश्चित होते. सामान्यत: मनुष्याची प्रवृत्ती निषिद्ध कर्म करण्याकडे असते. उद्योग-व्यवसाय करुन संपत्ती मिळवायला उशीर लागतो. म्हणून माणूस चोरी करुन किंवा भ्रष्टाचार करुन लवकरात लवकर श्रीमंत होण्याचा प्रयत्न करतो. कमी कष्टाने पटकन् धन मिळत असेल तर कशाला पुण्य-पापाची काळजी करायची? आहे तो क्षण भोगून घ्यावा, असा विचार तो करीत असतो. क्षणिक भोगांकडेच त्याची प्रवृत्ती असते. परंतु पुढील आयुष्यात त्याच्यावर पश्चात्ताप करण्याची पाळी येते. पाणी उताराकडे वाहते, त्याप्रमाणे मनुष्याचा स्वाभाविक कल निषिद्ध कर्माचरणाकडे असतो. पाण्याला टेकडीवर नेताना जसे श्रम पडतात, त्याप्रमाणे विहित कर्म निश्चयाने, श्रमाने करावी लागतात. थोडे विहित आणि बरेचसे निषिद्ध अशी कर्मे जीवात्म्याकडून घडतात. हे अज्ञानामुळे होते. म्हणून तो शरीरी होतो. कारण शरीराशिवाय कर्मफलांचा भोग घेता येत नाही. शरीर हेच सुख-दु:खांचे साधन आहे. म्हणून कर्मफळे भोगण्यासाठी अशरीरी आत्म्याला शरीरी व्हावे लागते. भोक्ता होण्याआधी कर्मा व्हावे लागते. जो कर्म करतो, त्यालाच त्याचे फळ भोगावे लागते.

सर्वव्यापी आणि अशरीरी आत्मा संकुचित आणि शरीरी कसा होतो? याचे उत्तर वीरशैवाचार्यांनी दिले आहे. ते म्हणतात, 'ही भगवान शिवाची लीला आहे' सृष्टी भगवंताची लीला आहे. सृष्टीत असलेले जीव परमात्म्याचे अंश होत. अखंड परब्रह्मच मनोविनोदनासाठी जणू खंडीत होऊन असंख्य जीवांच्या रुपांनी सृष्टीत आले आहे. **(क्रमश:) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

## जनमानस

# दर्जेदार नाटकांना प्रेक्षकांची नेहमीच पसंती

५ नोव्हेंबर हा दिवस जागतिक मराठी रंगभूमी दिन म्हणून साजरा करण्यात आला.

सन १८४३ मध्ये या दिवशी आद्य नाटककार विष्णुदास भावे यांच्या संगीत सीता स्वयंवर या नाटकाने मराठी रंगभूमीची मुहूर्तमेढ रोवण्यात आली. त्यामुळे ५ नोव्हेंबर हा दिवस जागतिक मराठी रंगभूमी दिन म्हणून साजरा केला जातो. मराठी रंगभूमीला १८० वर्ष पूर्ण झालीत. यावर्षी मराठी रंगभूमी १८१ व्या वर्षात पदार्पण करत आहे.



हा दिवस रंगभूमीवरील कलावंतांसाठी जणू सणच असतो. कलावंतांप्रमाणेच प्रेक्षकदेखील या दिवसाचे स्वागत करतात. मराठी नाटकाला प्रेक्षक मिळत नाहीत अशी ओरड आपल्याकडे नेहमीच होत असते; पण दर्जेदार नाटकांना प्रेक्षक आजही गर्दी करतात.

आजही नाट्यगृहाच्या बाहेर हाऊसफुल्लचा बोर्ड लागलेला दिसतो. मराठी माणूस आजही नाटकप्रेमी आहे. चांगल्या कलाकृतीला, चांगल्या अभिनयाला तो नेहमीच दाद देत असतो. शहराप्रमाणे ग्रामीण भागातील प्रेक्षकही नाटकवेडे आहेत; पण ग्रामीण भागात म्हणावे तसे नाटकांचे प्रयोग होत नाहीत.

गेल्या अनेक वर्षांपासून तर नाटक फक्त पुण्या-मुंबई पुरतेच उरले की काय अशी शंका येऊ लागली आहे. नाटकाला प्रेक्षक उरले नाही अशी ओरड करण्यापेक्षा नाटक सर्वव्यापी कसे होईल, याचा विचार नाट्यकर्मींनी करावा. दर्जेदार नाटकांची निर्मिती करून ती सर्वसामान्य प्रेक्षकांपर्यंत कशी पोहोचतील, याचा विचार व्हावा. प्रेक्षकांचे नाटकावरील प्रेम कमी झाले नाही तर नाटकच प्रेक्षकांपर्यंत पोहचण्यात कमी पडत आहे

**- श्याम ठाणेदार, पुणे.**

# युद्धाचे विपरित परिणाम

जगभरात कुठेही युद्ध सुरू असले तरी त्याचे विपरीत परिणाम जगावर होतात. महागाई वाढणे, आर्थिक मंदी, वस्तूंची टंचाई, युद्धग्रस्त देशातील नागरिकांना होणारा प्रचंड त्रास यामुळे युद्ध नको अशी अपेक्षा व्यक्त होते. पण अनेक कारणांनी युद्ध सुरु होते, त्यात होणारी जीवितहानी, वित्तहानी याला कोणताही इलाज असतो? या काळात अनेक दावे प्रतिदावे केले जातात. **- प्र. मु. काळे, नाशिक.**

# चंद्रावर वनस्पती लागवड..!

चीनमधील शास्त्रज्ञांच्या एका चमूने अलीकडेच एक अभ्यास मायक्रोग्रॅविटी सायन्स अँड टेक्नॉलॉजी आणि ॲक्टा ॲस्ट्रोनॉटिका या जर्नल्समध्ये प्रसिद्ध केला. ज्यामध्ये प्रयोग, त्याचे परिणाम आणि भविष्यातील चंद्र, मंगळ आणि इतर दूरस्थ अंतराळ स्थानावरील मोहिमांसाठी त्याचे संभाव्य परिणाम यांचे पुनरावलोकन केले. प्रयोगाने दाखवून दिले की प्रखर किरणोत्सर्ग, कमी गुरुत्वाकर्षण आणि दीर्घकाळ प्रखर प्रकाश असूनही चंद्रावर वनस्पती वाढू शकतात.

चंद्र ही अंतराळातील आपल्याला सर्वात जवळची वस्तू! त्यामुळे चंद्रावर जाणे हे बहुतेक प्रगतीशील देशांचे स्वप्न आहे. यात अमेरिका, रशिया, चीन आणि भारत हे देश यशस्वी झाले आहेत. भारताच्या चांद्रयान-३ मोहिमेने तर अभूतपूर्व यश पाहिले आहे. चंद्रावर केवळ जाणेच नाही तर राहणे हेदेखील माणसाचे स्वप्न आहे, परंतु पृथ्वीबाहेर अजूनही वास्तव्य करावे अशी उत्तम जागा नाही कारण सर्वात महत्त्वाचे म्हणजे अन्न, श्वसनायोग्य हवा अजून तरी इतरत्र कोठेही नाही, परंतु चंद्र हा आपलाच उपग्रह आहे आणि सर्वात जवळ आहे म्हणून येथे शक्यता निर्माण करता येते. यासाठी चीनने केलेले प्रयोग महत्वाचे ठरतात.

३ जानेवारी २०१९ रोजी चीनच्या चांग-ई-४ लँडरने चंद्राच्या आपल्याला कधीही न दिसणाऱ्या बाजूला स्पर्श केला आणि युटू रोव्हर तैनात केले. त्यावरील बायोलॉजिकल एक्सपेरिमेंट पेलोडने एक महत्वाचा प्रयोग केला. तो म्हणजे त्याने चंद्रावर पहिली वनस्पती वाढवण्याचा प्रयत्न केला. पेलोडमध्ये कापूस, बटाटा, अरेबिडोप्सिस आणि रेपसीड्स, माश्यांची अंडी, यीस्ट आणि १८ मिली पाणी असे सहा घटक होते जे सतत वातावरणाच्या दाबावर ठेवले गेले. या प्रयोगाचे परिणाम भविष्यातील बायोरिजनरेटिव्ह लाइफ सपोर्ट सिस्टीमविषयी माहिती देण्यास मदत करतील. ही माहिती पृथ्वीच्या कमी उंचीवरील म्हणजेच लो अर्थ भ्रमणकक्षेच्या पलीकडे स्थानके आणि मोहिमांसाठी



महत्वपूर्ण असेल. चीनमधील शास्त्रज्ञांच्या एका चमूने अलीकडेच एक अभ्यास मायक्रोग्रॅविटी सायन्स अँड टेक्नॉलॉजी आणि ॲक्टा ॲस्ट्रोनॉटिका या जर्नल्समध्ये प्रसिद्ध केला. ज्यामध्ये प्रयोग, त्याचे परिणाम आणि भविष्यातील चंद्र, मंगळ आणि इतर दूरस्थ अंतराळ स्थानावरील मोहिमांसाठी त्याचे संभाव्य परिणाम यांचे पुनरावलोकन केले. प्रयोगाने दाखवून दिले की प्रखर किरणोत्सर्ग, कमी गुरुत्वाकर्षण आणि दीर्घकाळ प्रखर प्रकाश असूनही चंद्रावर वनस्पती वाढू शकतात. चंद्र, मंगळ आणि अंतराळ स्थानकांमध्ये वनस्पती वाढवणे अनेक कारणांसाठी आवश्यक आहे. यामधून पौष्टिक अन्नाचा स्त्रोत तर मिळेलच शिवाय मोहिमांची अन्न पुनर्पुरवठ्याची गरज कमी होईल. तसेच वनस्पती तेथील कार्बन डायऑक्साइड काढून आणि ताजा ऑक्सिजन देतील, कचऱ्याचा पुनर्वापर करण्यास मदत करतील आणि क्रूच्या कल्याणात योगदान देतील.

बायोरिजनरेटिव्ह लाइफ सपोर्ट सिस्टीम तंत्रज्ञान दूरवरच्या अंतराळ मोहिमांसाठी उपयोगी असतील. अंतराळवीरांनी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर वनस्पतींची वाढ आणि एकपेशीय वनस्पती यांचा समावेश असलेले प्रयोग केले आहेत, परंतु पृथ्वीबाहेरील अंतराळ वस्तूंच्या नैसर्गिक वातावरणाचा बायोरिजनरेटिव्ह लाइफ सपोर्ट सिस्टीमच्या कार्यावर कसा परिणाम होईल हे अजूनही सांगता येणार नाही. चंद्र, मंगळ आणि इतर बाह्य ग्रहांवर जगण्याचा आधार निर्माण करताना पृथ्वीवरून अधिक गोष्टींची वाहतूक करणे अशक्य आहे. ऑक्सिजन आणि अन्नाच्या निर्मितीसाठी संसाधनांच्या अंतर्गत वापराची आवश्यकता विशेष महत्वाची आहे आणि जगण्याचा पाया स्थापित करण्यासाठी ही पहिली पायरी आहे, म्हणून वनस्पती लागवड प्रयोग खूप महत्वाचे आहेत.या संशोधनातून मिळणारे धडे अनुसरण करू इच्छित असलेल्या प्रत्येकासाठी मार्ग मोकळा करण्यात मदत करतील.

**- सुजाता बाबर.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळये.

## संक्षिप्त वृत्त



### कोंडीच्या उपसरपंचपदी शिवाजी नीळ

**उ.सोलापूर :** कोंडी ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी उद्धव बाळासाहेब ठाकरे(गट)चे शिवाजी सारंग नीळ यांची बिनविरोध निवड निवडणुक निरीक्षक अधिकारी सोमनाथ शिंदे यांनी सरपंच सुहासिनी मनोज निंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली, ग्रामसेवक मारुती कांबळे यांच्या उपस्थितीत करण्यात आली. यावेळी शिवसेना नेते प्रकाश वानकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.यावेळी सरपंच सुहासिनी निंबाळकर, लहू गायकवाड, भरत पाटील, मधुकर शिंदे, किसन भोसले, संजय पवार, बाबाराजे नीळ, माजी सरपंच सुरेश राठोड, विशाल भोसले, बालाजी भोसले, राजेंद्र भोसले, ज्ञानेश्वर वाघमारे, आबा राउत, प्रसाद नीळ, मनोज निंबाळकर, लक्ष्मण साबळे, दिलीप राउत, तुकाराम पवार, नागेश नीळ, विनायक भोसले, गणेश भोसले, औदुंबर नीळ, बालाजी नीळ, गुरुराज नीळ, समर्थ नीळ, योगेश नीळ,विनायक नीळ उपस्थित होते.

### अज्ञात चोरट्याने दुचाकी पळवली

**सोलापूर :** शेळगीतील धर्मराजनगर येथे पार्क करून ठेवलेली (एमएच.१३.एडब्लू. ४२४०) दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेली. ही घटना दि.३१ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर दरम्यान धर्मराज नगर येथे घडली. याप्रकरणी केदारनाथ प्रभाकर बचाटे (वय-४८) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला. तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल पवार हे करीत आहेत.

### पूर्व वैमन्यासातून मारहाण

**सोलापूर :** चार चाकी गाडीची नंबर प्लेट बनवण्यासाठी दाराशा हॉस्पिटलजवळ गेले असता तरूणास मागील भांडणाचा राग मनात धरून शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जखमी केल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. याप्रकरणी शहनवाज शेख, जाफर शेख, आयुब, इरफान (नई जिंदगी) असे गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. महमद दौला फारुख शेख (चंद्रकलानगर) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. तपास पोलीस हवालदार वाडीकर हे करीत आहेत.

### पुणे नाक्याजवळ कंटेनर उलटला

**सोलापूर :** जुना पुणे नाका परिसरातील हुंदाई शोरूमजवळ वळण घेत असताना कंटेनर उलटल्याने राजेशसिंग दलबहादुरसिंग (वय-४०), घनश्यामसिंग शामसिंग (वय-४२,रायबरेली, उत्तर प्रदेश) हे दोघे जखमी झाले. हे दोघे कंटेनर घेऊन विजयपूर ते पुणे असा प्रवास करीत होते. वळण घेत असताना वाहन उलटून दोघे जखमी झाले. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. फौजदार चावडी पोलिसात या अपघाताची नोंद झाली आहे.

# साहित्यामध्ये सामान्यांचे प्रश्न मांडले जावेत : मेधा पाटकर

## बार्शीत लोकशाहीर अमर शेख साहित्य पुरस्कारांचे वितरण

सुराज्य/बार्शी

**समाजातील सामान्यांचे प्रश्न साहित्यामध्ये मांडले पाहिजेत. साहित्यिकांनी लोकवादी साहित्याची निर्मिती केली पाहिजे. दुर्बलांच्या दुखांना वाचा फोडते तेच खरे साहित्य, असे मत जनआंदोलनांच्या राष्ट्रीय समन्वयक मेधा पाटकर यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या शाखा बार्शीच्यावतीने आयोजित लोकशाहीर अमर शेख साहित्य पुरस्कार प्रदान सोहळ्यात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी महाराष्ट्र गृहनिर्माण विकास महामंडळाचे माजी सहअध्यक्ष राजेंद्र मिरगणे होते.**

यावेळी मातृभुमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष ठोंबरे, मसापचे अध्यक्ष पां.न.निपाणीकर, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे खजिनदार जयकुमार शितोळे, मसापचे प्रकाश गव्हाणे, प्रकाश महामुनी, सुमन चंद्रशेखर उपस्थित होते.

यावेळी मसापच्यावतीने मान्यवरांच्या हस्ते विज्ञानकथा लेखक डॉ.सुनिल विभुते यांना 'मिरॅकल' या कथासंग्रहास, सोलापूरचे प्राचार्य डॉ.अरूण नवले यांना महाराष्ट्राची संतपरंपरा या ग्रंथाबद्दल, पुणे येथील लेखक डॉ.अविनाश सांगोलेकर यांना अविनाशपासष्ठी या काव्य संग्रहाबद्दल, परभणीच्या डॉ.राजेश गायकवाड यांना बिन चेहऱ्याच्या कविता या काव्य संग्रहाबद्दल लोकशाहीर अमर शेख पुरस्काराने गौरविण्यात आले. प्रास्ताविक निपाणीकर यांनी केले.



**बार्शीः बार्शी लोकशाहीर अमर शेख यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करताना मेधा पाटकर, राजेंद्र मिरगणे, पां.न. निपाणीकर, संतोष ठोंबरे आदी.**

यावेळी अध्यक्षीय समारोपामध्ये राजेंद्र मिरगणे म्हणाले, बार्शीची साहित्य परंपरा जपण्याचे काम या पुरस्कार सोहळ्यामुळे झाले आहे. बार्शीमध्ये साहित्य, कला, सांस्कृतिक कार्यक्रमांना लोकाश्रय आणि राजआश्रय मिळाला पाहिजे. यावेळी बोलताना जयकुमार शितोळे यांनी चांगल्या साहित्यिक कार्यक्रमांना समाजाने पाठबळ दिले पाहिजे असे मत व्यक्त केले.

यावेळी डॉ.रविराज फुरडे यांना शैक्षणिक योगदानाबद्दल तसेच लोककलावंत व अभिनेता फुलचंद नागटिळक यांना कला क्षेत्रातील योगदानाबद्दल व डॉ.नानासाहेब कसपटे यांना सिताफळ शेतीमध्ये केलेल्या कार्याबद्दल विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यावेळी कवी अशोक मोहिते यांच्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन झाले. कवयित्री सुनिता शिंगणाथ यांच्या गाण्याचे विमोचन झाले. सूत्रसंचालन निता देव यांनी केले. आभारप्रदर्शन बी.आर. देशमुख यांनी केले.

# एक परिमंडलातील दुकानदारांना प्रतिक्षा; रवा मात्र गायब

## आखेर शहरातील तीन परिमंडलात आनंदाचा शिधा पोहचला

सुराज्य/सोलापूर

दिवाळी अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली असताना शासनाकडून गरीब शिधापत्रिकाधारकांना देण्यात येणारा आनंदाचा शिधा अद्यापही रेशन दुकानांमध्ये पोहचला नसल्याच्या तक्रारी आल्यानंतर प्रशासनाने वाटपाचे नियोजन केले आहे. सोलापूर शहरातील चार परिमंडलात आनंदाचा शिधा पोहचला आहे. एक परिमंडलामध्ये मोठ्या प्रमाणात दुकानदारांची संख्या असताना आद्याप शिधाचे किट पोहचले नाही गोदामामध्ये दाखल किट मध्ये अद्याप रवा आला नाही त्यामुळे वाटप रखडले असल्याचे बोलेले जात आहे. शिधापत्रिकाधारकांकडून वारंवार किटची मागणी केली जात असल्याने रेशन दुकानदार वैतागले आहेत.

मोठा गाजावाजा करत शासनाने दिवाळीसाठी केवळ शंभर रुपयात आनंदाचा शिधा देण्याचे जाहीर केले. २५ ऑक्टोबरपासून हा शिधा वाटप करण्याच्या सूचना होत्या. त्यानुसार आनंदाचा शिधा गोदामात पोहोचला. मात्र रेशन दुकानदारापर्यंत तो अद्याप गेला नाव्हता याबाबतच्या तक्रारी दाखल झाल्यानंतर सोलापूर शहर आणि जिल्ह्यामध्ये वाटपाचे नियोजन करण्यात आले आहे. जिल्हामध्ये आज मंगळवार पासून वाटप केले जाणार असल्याचे प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले.



सोलापूर शहरात वतीन मागणी केलेल्या १ लाख १७ हजार १०० किट पैकी शंभर टक्के किट पोहचले आहे. साखरेचे १ लाख १७ हजार १००, तेल ९७ हजार ८००, पोहे १ लाख ८ हजार, चणादाळ ८५ हजार १३८, मैदा ८५ हजार १४०, रवा फक्त ५० टक्के ५६ हजार २८० किट पोहचले आहेत. त्यानुसार अन्नवितरण अधिकारी सुमित शिंदे यांनी वाटपाचे नियोज केले आहे. आज आखेर ए परिमंडल मध्ये१४ हाजे ४०० पैकी मागणी प्रमाणे सर्व किट पोहचले आहे. त्यापैकी १४६६ किट विक्री झाले आहेत. ब परिमंडल मध्ये ३१ हजार ९९७ मागणी पैकी १८ हजार ३२७ किट पोहचले आहेत. त्यापैकी १५३ किटची विक्री झाली आहे. सी परिमंडल मध्ये ४७ हजार १५० किटची मागणी आहे या दुकानदारापर्यंत एक ही किट पोहचले नाही. डी परिमंडल विभागात २३ हजार ५५३ किटची मागणी आहे. सर्व किट पोहचले आहेत. तर १९२३ किटची विक्री झाली आहे .एक दिवसात ३ हजार ५४२ किट विक्री झाली आहे. ५६ हजार २८० किट अद्याप पोहचले नाहीत दोन दिवसात सदरचे किट येण्याची शक्यता आहे.

### मागणीपैकी ५० टक्के किट प्राप्त

आनंदाचा शिधा गोदामात उपलब्ध झाला आहे. मात्र शहराती काही दुकानात पोहचला आहे. मात्र मागणीच्या किटपैकी ५० टक्के किट प्राप्त झाले आहेत. रवा अद्याप मिळाला नाही त्यामुळे एक परिमंडलामध्ये वाटप झाले नाही त्यामुळे रेशन दुकानदारांना ग्राहकांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे.

– **नितीन पेंटर**, जिल्हा संपर्कप्रमुख, रेशन दुकानदार संघटना

# उमेदच्या रुक्मिणी दिवाळी महोत्सवाचे उद्घाटन

सुराज्य/सोलापूर

उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत सोलापूर जिल्ह्यातील स्वयंसहायता समूहानी केलेल्या उत्पादनाचे प्रदर्शन व विक्रीसाठी आयोजित केलेल्या रुक्मिणी दिवाळी महोत्सवाचे उद्घाटन मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांच्या हस्ते झाले.

यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, प्रकल्प संचालक सुधीर ठोंबरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव, जिल्हा आरोग्य अधिकारी संतोष नवले, जिल्हा अभियान व्यवस्थापक सचिन चवरे हे उपस्थित होते.

बचत गटांनी उत्पादित केलेला सुकामेवा, हस्तकला साहित्य, फराळाचे पदार्थ व चॉकलेट, पणत्या, आकाश कंदील यांची खरेदी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्वतः करून अधिकारी, कर्मचारी यांना खरेदी करण्याचे आवाहन केले.

मनिषा आव्हाळे म्हणाल्या की, उमेद अभियानाच्या माध्यमातून तयार केलेल्या उत्पादनाचे मार्केटिंग करून त्यांना बाजारपेठ उपलब्ध होण्यासाठी पुढील काळात प्रयत्न केले जाणार असल्याचे सांगितले.

सदर रुक्मिणी दिवाळी महोत्सवमध्ये नावीन्यपूर्ण उत्पादनांचे २५ स्टॉल लावले आहेत. यासाठी जिल्हा अभियान व्यवस्थापक सचिन चवरे, लेखाधिकारी शुभांगी देशपांडे, जिल्हा व्यवस्थापक राहुल जाधव, मीनाक्षी मडीवळी, दयानंद सरवळे, अमोल गलांडे, शीतल म्हंता, तालुका अभियान व्यवस्थापक, प्रभाग समन्वयक परिश्रम घेत आहेत.

# प्रताप क्रीडा मंडळाने सामाजिक बांधिलकीतून एक आदर्श निर्माण केला : प्रमोद शिंदे

## रत्नाई मिठाईः २०२३

सुराज्य/अकलूज

कला, क्रीडा, सांस्कृतिक, सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शंकरनगर अकलूज च्या प्रताप क्रीडा मंडळाच्या वतीने समाजातील सर्वसामान्य गरजू लोकांना दिवाळीचा सण साजरा करता यावा, या उद्देशाने 'ना नफा ना तोटा' या तत्वावर रत्नाई मिठाई विक्री केंद्र सुरु करण्यात आले आहे.

या 'रत्नाई मिठाई' केंद्राचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ अकलूज आगाराचे प्रमुख प्रमोद शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी मंडळाचे संस्थापक-अध्यक्ष जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील, मंडळाच्या अध्यक्षा स्वरूपाराणी जयसिंह मोहिते-पाटील उपस्थित होते.

प्रास्ताविकात प्रमुख विजय उबाळे म्हणाले, गतवर्षी ४७४७ किलो विक्री झाली होती. यंदाही यास भरघोस प्रतिसाद मिळत असून, ३२३१ किलो ॲडव्हान्समध्ये बुकिंग झाले आहे. तसेच नियमित विक्रीही जोमाने चालू आहे.



याप्रसंगी बोलताना प्रमोद शिंदे म्हणाले, मंडळाने अनेक सामाजिक उपक्रम, उद्बोधनपर कार्यक्रम, राज्य, राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या आहेत. 'रत्नाई मिठाई' हा देखील एक स्तुत्य उपक्रम आहे. या उपक्रमामुळे महिलांचा त्रास कमी होणार असून, किफायतशीर दरात स्वादिष्ट पदार्थ मिळणार आहेत. तरी या संधीचा लाभ सर्वांनी घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

सदर रत्नाई मिठाई वाटप केंद्र मारुती मंदिराजवळ, शंकरनगर येथे दि.५ नोव्हेंबर ते ७ नोव्हेंबरदरम्यान सकाळी १० ते रात्री ८ या वेळेत सुरू राहणार आहे. या केंद्रात चिवडा, लाडू, बालुशाही, शंकरपाळी, शेव आदी फराळाचे पदार्थ किफायतशीर दरात उपलब्ध आहेत. यामध्ये प्रतिकिलो चिवडा २३५ रुपये, लाडू- २४५ रुपये , बालुशाही २४५ रुपये, शंकरपाळी २३५ रुपये, शेव २३० रुपये असे दर ठेवले आहेत. मिठाईच्या मागणीसाठी नामदेव कुंभार (९५११८०८००४), जयंतराव माने देशमुख (७७२००६७८२), शिवाजीराव पारसे (८३२९५९००६५), बाळासाहेब सावंत (९९६०१९५८३९) यांच्याकडे नोंदणी करावेत.

# माळीनगर, कण्हेर, ग्रामपंचायतीमध्ये सत्तांतर



सुराज्य/माळशिरस

तालुक्यातील नऊ ग्रामपंचायतीच्या निवडणुकीची मतमोजणी तहसीलदार सुरेश शेजूळ यांच्या मार्गदर्शनाखाली आज तहसील कार्यालयात झाली.

या ग्रामपंचायतीसाठी ७९ टक्के मतदान झाले होते .या नऊ ग्रामपंचायतीपैकी माळीनगर, कण्हेर या ग्रामपंचायतीच्या निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले होते.

माळीनगर ग्रामपंचायतीवर गेले १० वर्ष रंजन गिरमे यांची सत्ता होती.या निवडणुकीत सत्तांतर होऊन या ग्रामपंचायतीवर मोहिते पाटील यांची सत्ता आली असून सरपंचपदी अनुसया एकतपुरे या विजयी झाल्या आहेत .विराज निंबाळकर गटाचे १२ सदस्य तर गिरमे गटाचे पाच सदस्य निवडून आले.


कण्हेर ग्रामपंचायतीमध्ये सत्तांतर होऊन माजी पंचायत समिती सदस्य गौतम माने यांच्या गटाची सत्ता आली.सरपंचपदी बाजीराव माने हे विजयी झाल असून १२ सदस्य निवडून आले आहेत.विरोधी मोहिते पाटील गटाला एकच जागा मिळवता आली. लवंग ग्रामपंचायतीमध्ये दोन स्थानिक आघाड्यात लढत झाली.सरपंच व सहा जिंकून मोहिते पाटील गटाने आपले वर्चस्व सिद्ध केले .सरपंचपदी प्रशांत पाटील हे विजयी झाले आहेत तर विरोधी गटाला सात जागा मिळवता आल्या.

धर्मपुरी ग्रामपंचायतीमध्ये बाजीराव काटकर व नितीन निगडे गटाने पुन्हा सत्ता काबीज केली असून निता नवनाथ झेंडे या सरपंचपदी निवडणू आल्या आहेत.या आघाडीला १३ पैकी नऊ जागा मिळाल्या आहेत तर १ जागा विजय पाटोळे गटाला,तेजस पाटील गटाला १ संघर्ष ग्रुपला २ जागा मिळाल्या.

वाफेगाव ग्रामपंचायतीच्या निवडणुकीमध्ये सत्तांतर झाले असून दत्तात्रय हेंबाडे गटाची सत्ता आलीअसून विजया एकनाथ शिंदे या सरपंचपदी निवडून आल्या आहेत. कोंडारपट्टा ग्रामपंचायतीवर अरुण भोसले गटाची सत्ता आली असून प्रकाश जाधव सरपंचपदी निवडून आले आहेत.

सवतगव्हाण या ग्रामपंचायतीचे सरपंचपद व तीन जागा बिनविरोध झाल्या होत्या रिना पवार या निंबाळकर गटाच्या सरपंचपदी बिनविरोध झाल्या होत्या उर्वरित जागा या गटाने मिळवून संपूर्ण सत्ता मिळवली आहे.निकालानंतर विजयी उमेदवारांनी उलालाची उधळण करीत जल्लोष केला. कारुंडे ग्रामपंचायत निवडणुकीत सत्तांतर होऊन हनमंत पाटील गटाची सत्ता आली असून नंदा कैलास नामदास या सरपंचपदी निवडून आल्या आहेत. दहीगाव ग्रामपंचायती निवडणुकी मध्ये अरुण सावंत,शरद मोरे,रणधीर पाटील,बाळासाहेब कदम यांनी एकत्र येऊन नारीशक्ती विकास आघाडी केली होती या आघाडीच्या सोनम राजू खिलारे या निवडून आल्या त्याच बरोबर सदस्याच्या सर्वच जागा मिळवल्या आहेत.तर मुकुंद मोरे गटाला एकही जागा मिळवता आली नाही.

# जुन्या पिढीतील डॉ. रतनचंद करकमकर यांचे निधन



**सोलापूर :** सोलापूर शहरातील जुन्या पिढीतील नामवंत डॉ. रतनचंद माणिकचंद करकमकर यांचे सोमवार, दि. ६ नोव्हेंबर रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. मृत्यूसमयी ते ९१ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा डॉ. सुहास करकमकर, मुलगी जाई, सांगवी, सून, नातवंडे असा परिवार आहे.

होमगार्ड मैदान रेल्वे लाईन्स येथील निवासस्थानी त्यांचे पार्थिव ठेवण्यात आले होते. त्यांच्या पार्थिवावर सोमवारी दुपारी मोदी विद्युत दाहिनीत अंत्यसंस्कार करण्यात आले.इंडियन मेडिकल असोसिएशन सोलापूरचे त्यांनी उपाध्यक्ष म्हणूनही काम केले आहे. सोलापुरातील वैद्यकीय आणि सामाजिक क्षेत्राशी त्यांचा अनेक वर्षे संबंध होता. येथील बाजीराव चौक येथे त्यांचे गेल्या अनेक वर्षांपासून क्लिनिक आहे.

# जयहिंद शुगरच्या पहिल्या ११ साखर पोत्यांचे पूजन

सुराज्य/दक्षिण सोलापूर

दक्षिण सोलापूर तालुक्यातील आचेगाव येथील जयहिंद शूगरच्या चालू हंगामात उत्पादीत झालेल्या पहिल्या अकरा साखर पोत्यांचे पूजन गंगापूर युनिटच्या प्रेसिडेंट डॉ. सुष्मिता विखे-पाटील, चेअरमन गणेश माने-देशमुख यांच्या हस्ते कारखाना कार्यस्थळी पार पडले.

माने-देशमुख म्हणाले, परिस्थिती कितीही अडचणींची असली तरी अधिकाधिक गाळप करून शेतकऱ्यांना प्रतिटन पहिला हप्ता २,५११ रुपयेप्रमाणे देण्याचा निर्णय कारखान्याने घेतला आहे. गेल्या वर्षी ७ लाख ११ हजार मेट्रिक टन उसाचे गाळप केले होते. मार्चच्या आधी शेतकऱ्यांच्या खात्यावर एकरकमी प्रतिटन २,३५० रुपये जमा केले होते. यावर्षी भीषण दुष्काळी परिस्थिती आहे, तरीही कारखान्याने गाळप हंगाम यशस्वी करण्याचा निर्धार केला आहे.




**दक्षिण सोलापूरः आचेगावच्या जयहिंद शुगरच्या पहिल्या ११ साखर पोत्यांचे पूजनप्रसंगी मान्यवर.**

याप्रसंगी प्रेसिडेंट बब्रुवान माने-देशमुख, शालिवाहन माने-देशमुख, व्हाईस चेअरमन विक्रमसिंह पाटील, सोमनाथ माने-देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र देशमुख, प्रकल्प समन्वयक अमोल जगताप, विजय पाटील, रविप्रकाश मेंगर, केन मॅनेजर राजेंद्र जेऊरे, मुख्य शेतकी अधिकारी राहुल घोगरे, ऊस विकास अधिकारी तोरणे, माने-देशमुख कुटुंबातील सदस्य, सर्व खातेप्रमुख, सर्व कर्मचारी, ठेकेदार, शेतकरी उपस्थित होते.


महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## ई-निविदा सूचना

केडगाव विभागातिल टीओडी ग्राहकांचे मासिक मिटर वाचन करण्यासाठी नामांकित नोंदणीकृत अनुभवी ठेकेदार यांचे कडुन ई निविदा मागविण्यात येत आहेत .

| निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम |
|---|---|---|
| टि-१५/२०२३-२४ | टीओडी ग्राहकांचे मासिक मिटर वाचन करणे | रू.६०.०० लाख |

कोरी निविदा संच महावितरणचे संकेत स्थळावर दि.०७.११.२०२३ ते १५.११.२०२३ पर्यंत डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध राहील. वरील सर्व निविदा शुल्क फक्त ऑनलाइन पदधतीनेच भरणे आवश्यक आहे. कोणतेही कारण न देता कोणतीही अथवा सर्व निवीदा नाकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरी काराने स्वतः कडे राखुन ठेवला आहे. अधिक माहिती साठी कंपनीचे संकेत स्थळ पहावेः http://works.mahadiscom.in/eTender/etender. फोन क्र. (०२११९)२२४७८३.

पीआरओ क्र.BMTZ/ १३६/२०२३-२४

कार्यकारी अभियंता,
केडगाव विभाग

## अक्कलकोट ग्रामपंचायत निवडणूक...

# अक्कलकोटमध्ये १८ पैकी १६ ग्रामपंचायतीवर भाजपाचे वर्चस्व

सुराज्य/अक्कलकोट

अक्कलकोट विधानसभा मतदार संघातील अक्कलकोट तालुक्यातील १८ पैकी १६ ग्रामपंचायतीवर भाजपाने वर्चस्व राखले. काँग्रेसने दोन तर दक्षिण सोलापूर तालुक्यातील ७ पैकी ४ ग्रामपंचायतीवर भाजप तर तीन ग्रामपंचायतींवर काँग्रेसने वर्चस्व राखले.

अक्कलकोट तालुक्यातील १८ ग्रामपंचायतीसाठी रविवारी ८१.८३ टक्के मतदान झाले होते. सोमवारी सकाळी नवीन तहसील कार्यालयात मतमोजणी झाली. विजयी नूतन सरपंच, ग्रामपंचायत सदस्यांनी एकच जल्लोष करीत फटाक्याची आतिषबाजी केली.

अक्कलकोट तालुक्यातील जकापूर ग्रामपंचायत सरपंच पदाच्या निवडणुकीत लक्ष्मीबाई वंटे (३१४ मते), सदस्यांतून कलावती पुजारी, सविता पुजारी, सामबाई मणुरे, मलप्पा पाटील, तुकाराम अगतनळी, शरणव्वा करजगी हे विजयी झाले.

करजगीमध्ये सरपंचपदासाठी विवेकानंद उंबरजे (२२७८ मते), सदस्यासाठी रवी लिंबोळे, गजा सोमण्णा, प्रमिला कुंभार, शब्बीर पटेल, मोनिका नायकोडी, हिराबाई अनंतपुरे, दस्तगीर गोडीकट, भिमाशंकर चडचण, रेणुका पटेद, बसवराज कोकणे, नागम्मा डबरे, स्वाती धसाडे, बसवराज सवळी, सुषमा येळमेले, मलव्वा नागणसुरे हे विजयी झाले.

केगांव बु. मधून सरपंच श्रीशैल आहेरवाडी (६४४ मते), सदस्यासाठी अश्विनी गुणापुरे, विजयालक्ष्मी दुधनी, रमेश देसाई, भिमाशंकर भंडारकवठे, सातव्वा मडनोळी, रविकांत जमादार, सुधाराणी शिंदे हे विजयी झाले.

केगांव खु.मधून सरपंच प्रभावती बगले (३३६ मते), सदस्यासाठी नागेंद्र बगले, धानम्मा सुतार, राजश्री बिराजदार, इरप्पा हेगरगी, कमलाबाई चपळगे, संतोष मुडवे, सुवर्णा बगले विजयी झाले.


म्हैसलगेमधून सरपंचपदासाठी सुनील खेड (११९१ मते), सदस्यासाठी संतोष माशाळे, लक्ष्मीबाई देसाई, महादेवी कोळी, मल्लिकार्जुन बिराजदार, अशोक बिराजदार, शोभा देसाई, रामचंद्र शिंगे, जयश्री माशाळे, निंगव्वा औराद हे विजयी झाले.

रामपूर-इटगेतून सरपंच दिलीप कदम (२०९ मते), सदस्यासाठी शालनबाई चेंडके, गैनी कोळी, सुगलाबाई बनसोडे, सोमशंकर दिंडोरे, अश्विनी कोणदे, सरुबाई बिराजदार (बिनविरोध), संतोष सुतार विजयी झाले.

हसापूरमधून सरपंचपदासाठी तुळसाबाई कामाठी (५२८ मते), सदस्यासाठी मारुती घटकांबळे, सावित्री घटकांबळे, गौतम घटकांबळे, कृष्णाबाई सदाफुले, गणेश कामाठी, मिनाक्षी शिंदे विजयी झाले.

शावळमधून सरपंचासाठी नितीन चव्हाण (६३५ मते), सदस्य:- सिध्दाराम पुजारी, शरणप्पा तडवळ, सरस्वती शिवशरण, विनय शिवशरण, रुपाली पाटील, प्रमिला जाधव, बिरप्पा माळगे, गंगाबाई राठोड, पारुबाई चव्हाण विजयी झाले.

कुडलमधून सरपंचपदासाठी गुजेव्वा जमादार (३८७ मते), सदस्यासाठी पवन पुजारी, शरिफा मुजावर, निंगप्पा जमादार, कलावती शिवशरण, रेवम्मा स्वामी, सुनंदा चव्हाण, जयाबाई बनसोडे विजयी झाले.



धारसंगमधून सरपंचासाठी जगदेवी कोळी (२४३ मते), सदस्य:- नागेश चाबुकस्वार, महानंदा कांबळे, संतोष कोळी, संतोष पाटील, सुनंदा पुजारी, शैलजा नरोणे, शांताबाई कोळी विजयी झाले. कल्लकर्जाळमधून सरपंचासाठी बसलिंगव्वा कोडते (५२९ मते), सदस्यासाठी श्रीमंत ईश्वरकट्टी, सिध्दाराम कोळी, रुपाली धुळे, पंडित ईश्वरकट्टी, सलीमा पाटील, भौरम्मा मैंदर्गी, जगदेवी ईश्वरकट्टी, प्रिती ईश्वरकट्टी, निजामोद्दीन बिराजदार हे विजयी झाले.घुंगरेगांवातून सरपंचासाठी सुमन गुरव (२०३ मते), सदस्यासाठी अशोक बनसोडे, अंबव्वा बनसोडे, जयंती माने, सचिन बसरगी, अनसाबाई गुरव, सोमनिंग बिराजदार, लक्ष्मी बनसोडे विजयी झाले. जेऊरवाडीतून सरपंचासाठी कमलाबाई राठोड (३५० मते ), सदस्यातून तारु राठोड, वृषाली भालेराव, मीना जाधव, रोहित भालेराव, श्रीदेवी राठोड, विजय भालेराव, सीताबाई चव्हाण हे विजयी झाले.नन्हेगांवातून सरपंचसाठी रेखा पाटील (५२८ मते), सदस्यासाठी अजयकुमार गायकवाड, श्वेता बंदीछोडे, मालनी चौधरी, कृष्णा खुडे, जैनबी पठाण, सिद्रामप्पा मंगरुळे, रेखा सोनकांबळे.

दहिटणेमधून सरपंचासाठी नितीन मोरे (७४४ मते), सदस्यासाठी मुलूकसाब शेख, विकी चौधरी, चंद्रकला कांबळे, रुक्मिणी कांबळे, शिवशरण बोळशेट्टी, सत्यवती कोळी, अंबुबाई कटकधोंड, शहनाज मुजावर, गोपाळ क्षिरसागर, सरस्वती चोरमले, श्वेता जाधव हे विजयी झाले.

तळेवाडमधून सरपंचासाठी सिध्दव्वा खाती (६२२ मते), सदस्यासाठी गजानन हिळळी, कस्तुरबा करमल, निर्मला पाटील, माळप्पा हिळळी, भौरेमम्मा रायगोंडे, धर्मण्णा कोटी, संगव्वा शिंगे हे विजयी झाले.

बिंजगेर/हालहळळी मैं. मधून सरपंचासाठी विठ्ठल अरवत (३६५ मते), सदस्यासाठी देविदास बिराजदार, जनाबाई कोटी, शांताबाई माडबाळ, संतोष धन्नळी, भौरम्मा घोडके, सुरेखा बिरजदार, केसर इट्टेनवरु, संतोष गायकवाड, यल्लप्पा पुजारी (बिनविरोध) हे विजयी झाले.

कंठेहळळीतून सरपंचासाठी दिव्या येडे (३५९ मते), सदस्यासाठी जनाबाई गायकवाड, जैनबी जमादार, गुंडप्पा बिराजदार, गंगाबाई चेंडके, ललिता मकाशे, निर्मला बिराजदार, चंद्रकांत वाघे हे विजयी झाले.

## संक्षिप्त वृत्त



सोलापूरः विडी घरकूल येथील श्री बसवेश्वर मराठी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी आकाश कंदील तयार केले आहे.

### बसवेश्वर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी तयार केले आकाश कंदील

**सोलापूर :** संभाजीराव शिंदे विद्यामंदिर संचलित श्री बसवेश्वर मराठी विद्यालय, विडी घरकूल येथील चौथीच्या विद्यार्थ्यांनी पर्यावरण पूरक आकाश कंदील तयार केले. विद्यार्थ्यांना कार्यानुभवांतर्गत सोपे उपक्रममधील आकाश कंदील बनविण्याची प्रात्यक्षिके शिक्षकांनी करून दाखवले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी कार्डशिट, पेपर, घोटीव कागद, रंगबेरंगी चिकट टेप आदी साहित्य वापरून आकर्षक असे आकाश कंदील बनवले. यावेळी मुख्याध्यापिका मारपली यांनी विद्यार्थ्यांना आरोग्यदायी दिवाळी साजरी करण्याचे आवाहन केले.

---

### महिलेच्या पर्समधील लाखांची दागिने लंपास

**अक्कलकोट :** अक्कलकोट येथील एसटी स्टॅन्ड येथे महिलेचे पर्समधील एक लाख सात हजार रूपयाचे सोन्याचे दागीने अज्ञातने चोरून नेल्याची घटना घडली. अशी फिर्याद दिलशाद शमीर पठाण (वय-२८ वर्षे) हिने दिली. याबाबत उत्तर पोलीस ठाण्यामध्ये अज्ञात चोरट्याविरूद्ध गुन्हा दाखल झाला आहे. दि. ५ नोव्हेंबर रोजी फिर्यादी महिलेचे मामा रमजान शेख यांच्या अक्कलकोट येथील घरी कार्यक्रम असल्याने त्या सोन्याचे गळ्यातील मणी, मंगळसूत्र, गंठन, कर्णफुले, नेकलेस आदी पर्समध्ये ठेऊन सोलापुरातून निघाल्या होत्या. सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास रंगभवन ते अक्कलकोट बसने साडेअकरा वाजता अक्कलकोट येथे आल्या. त्यानंतर अक्कलकोट एसटी स्टॅन्ड येथील मेडीकलवर जाऊन पाणी बॉटल घेऊन पैसे देण्यासाठी त्यांनी पर्स उघडले असता दागिने चोरीला गेल्याची लक्षात आले. अज्ञात इसमाने पर्सची चैन उघडून ४५ हजार रूपयांचे १५ ग्रॅम वजनाचे एक सोन्याचे नेकलेस, सतरा हजार रूपयाचे ०६ अंदाजे ग्रॅम वजनाचे सोन्याचे कर्णफुले, तीस हजार रूपयाचे १० ग्रॅम सोन्याचे गळ्यातील मणी मंगळसूत्र, पंधरा हजार रूपयाचे पाच ग्रॅम सोन्याचे गंठन असे एकूण एक लाख सात हजार रुपये किंमतीची सोन्याचे दागीने चोरुन नेले आहे.

---

### बालिकेच्या अपहरणप्रकरणी आरोपीला पोलीस कोठडी

**सोलापूर :** सलगर वस्ती पोलीस ठाणे हद्दीतील अपहरण केलेल्या मालिकेचा अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडून छडा लावला. असून, आरोपीला ताब्यात घेतले असून, त्यास दि. ८ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली. या गुन्ह्यातील अल्पवयीन बालिकेस संशयीत आरोपी सम्राट बाळासाहेब शेले (इचलकरंजी) याने आमीष दाखवून पळवून नेले होते. सलगर वस्ती पोलीस ठाणे तत्कालीन तपासीक अंमलदारांनी हा गुन्हा अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडे वर्ग केला होता. तपासीक अंमलदार पो.नि.महादेव राऊत यांनी संशयित आरोपी सम्राट शेले, बालिका यांना दि. ४ नोव्हेंबर रोजी गडहिंग्लज येथून ताब्यात घेतले. सलगर वस्ती पोलीस स्टेशन येथे हजर केले. त्यानंतर त्यास न्यायालयात हजर केले असता त्याला दि. ८ नोव्हेंबर २०२३ पर्यत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहे.

# रिपाइं आठवले गटाची जिल्हा कार्यकारिणी जाहीर

सुराज्य/वेळापूर

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांच्या आदेशावरून, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर जिल्हाध्यक्ष सोमनाथ भोसले यांच्या नेतृत्त्वाखाली सोलापूर जिल्हा कार्यकारणी जाहीर करण्यात आली. याप्रसंगी जिल्हाध्यक्ष सोमनाथ भोसले (माळशिरस), जिल्हा सरचिटणीस श्यामसुदर गायकवाड (उत्तर सोलापूर), जिल्हा कार्याध्यक्ष विक्रम शेळके (सांगोला), जिल्हा संघटन सचिव सिध्दार्थ बनसोडे (दक्षिण सोलापूर), जिल्हा खजिनदार विठ्ठल क्षीरसागर (मोहळ), प्रसिध्दी प्रमुख जीवन हिपरगीकर (उत्तर सोलापूर), जिल्हा उपाध्यक्ष परमेश्वर खरात (माढा),जिल्हा उपाध्यक्ष अंकुश शेडगे (मोहळ), जिल्हा उपाध्यक्ष संजय गवळी (उत्तर सोलापूर), जिल्हा उपाध्यक्ष सतीश शिदे (दक्षिण सोलापूर), जिल्हा उपाध्यक्ष सैंदप्पा झळकी (अक्कलकोट),



जिल्हा उपाध्यक्ष दिगंबर चंदनशिवे (सांगोला), जिल्हा उपाध्यक्ष अर्जुन गाडे,जिल्हा उपाध्यक्ष सतोष गायकवाड माळशिरस,जिल्हा उपाध्यक्ष शामराव भोसले माळशिरस,जिल्हा उपाध्यक्ष बाबा साखरे मंगळवेढा, जिल्हा उपाध्यक्ष राजा दावणे सोलापूर, जिल्हा उपाध्यक्ष सुग्रीव जेटीथोर सोलापूर, जिल्हा सचिव सोमनाथ घोडकुंबे द सोलापूर, जिल्हा सचिव किरण आठवले द सोलापूर,जिल्हा सचिव सतीश काटे सांगोला,जिल्हा सचिव



रवि बनसोडे सांगोला,जिल्हा सचिव भारत आठवले माळशिरस, जिल्हा सचिव रमेश धाईंजे माळशिरस,जिल्हा सचिव चिमाजी कसबे मंगळवेढा, जि संघटक पोपट लोंढे माढा,जि संघटक बाबा कसबे मोहळ,जि संघटक बाबा माने द सोलापूर, जि संघटक सोपान गायकवाड अक्कलकोट,जि संघटक राजा मागाडे सांगोला, जि संघटक तुकाराम बाबर माळशिरस, इत्यादींची जिल्हा कार्यकारणी वरती सर्वानुमते निवड करण्यात आली आहे असे सोमनाथ भोसले यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

## जन्म-मृत्यू नोंदीची किचकट प्रक्रिया; दाखले तहसीलदारांमार्फत मिळावेत

**मोहोळ तालुक्यातील ग्रामीण भागातील जनेतची मागणी**

सुराज्य/चिखली

जन्म-मृत्यू नोंदीची प्रक्रिया किचकट असून, ग्रामीण व सामान्य नागरिकात जन्म- मृत्यू नोंदीबाबत जागरूकता नसल्याने सहसा जन्म -मृत्यू अशा नोंदी वेळेवर केल्या जात नाहीत. जन्म मृत्यूची नोंदणी निर्धारित वेळेत नाही केली तर दिवाणी न्यायालयात अर्ज करून आदेश घ्यावे लागते. ही प्रक्रिया वेळखाऊ किचकट आणि खर्चिक असल्याने सर्वसामान्य लोकांना अतिशय त्रासदायक आहे. त्यामुळे जन्म-मृत्यूचे दाखले आता तहसीलदार यांच्या मार्फतच देण्यात यावेत, अशी मागणी मोहोळ तालुक्यातील ग्रामीण भागातील जनतेतून करण्यात येत आहे.

सध्या जन्म व मृत्यूची नोंद, हा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. महिती अभावी अथवा नजरचुकीने नोंदणी करण्याचे राहून गेल्यास शैक्षणिक किंवा इतर कामासाठी लागणारे दाखले मिळविण्यासाठी या नोंदीची अत्यंत आवश्यक आहे. मात्र ते मिळविण्यासाठी नागरिकांना न्यायालयात सर्व पुरावे सादर करून नोंदीची प्रक्रिया पार पाडावी लागत आहे. यात बराच कालावधी जात आहे त्यासाठी सर्वसामान्य नागरिकांना वेळ,श्रम, पैसा मोठ्या प्रमाणावर खर्चाचा भुर्दंड बसत आहे. यापूर्वी जन्म -मृत्यू बाबतचे आदेश कार्यकारी दंडाधिकारी (तहसीलदार) यांच्याकडून पारित होत होते. ते नागरिकांसाठी सोईचे होते.

त्यामुळे अल्पशिक्षित व्यक्तींही सहजतेने अर्ज करू शकत होती. परंतु काही वर्षांपासून तहसीलदार यांचे आदेश काढून दिवाणी न्यायालयाकडे दिल्याने न्यायिक प्रक्रियेत खूप वेळ आणि पैसा वाया जात आहे. त्यामुळे आता मुदतीनंतर करण्यात येणाऱ्या जन्म - मृत्यू -नोंदीची पडताळणी करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी किंवा उपविभागीय दंडाधिकारी यांना देण्यात यावे आणि सदर जन्म - मृत्यू दाखले हे तहसीलदार कार्यालय मार्फतच मिळावे अशी मागणी नागरिकांतून करण्यात येत आहे.

## सावतामाळी विद्यालयात फटाके विरोधी अभियान



मोडनिंबःअरण येथील सावता माळी विद्यार्थी प्रदूषणमुक्त दिवाळीसाठी फटाके विरोधी अभियानाची शपथ घेताना.

सुराज्य/मोडनिंब

सामाजिक वनीकरण विभागाअंतर्गत असलेल्या राष्ट्रीय हरीत सेनेच्यावतीने अरण येथील संत सावतामाळी विद्यालयात प्रदूषणमुक्त दिवाळीसाठी फटाके विरोधी अभियान राबविण्यात आले.

दरवर्षी प्रमाणे संस्थेचे कार्याध्यक्ष भारत आबा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी विद्यार्थी, शिक्षक यांनी फटाके न फोडण्याचा संकल्प केला. फटाक्यात घातक रसायने असतात. फटाक्याने ध्वनी प्रदुषण होते. हवेचे दुषिती करण होते, पर्यावरणाची मोठी हानी होते.

मानवी आरोग्य बिघडते. श्वसन संस्थेचे विकार जडतात, फटाक्यातील घातक रसायने मज्जासंस्था, त्वचा, रक्त वाहिन्या यावर विपरीत परीणाम करतात. जंगली प्राणी, पक्षी यांनाही याचा त्रास होतो.तसेच भारतात दरवर्षी सुमारे बाराशे कोटी रुपये फटाके फोडन्याने बरबाद होतात.

या सर्व बाबी लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना हरितसेनेच्या वतीने समन्वयक तानाजी इंगळे यांनी माहिती देऊन शपथ दिली.

**● गेल्या वीस वर्षांपासून सुरू असलेल्या अभियानास विद्यार्थी, पालकांचा मोठा पाठिंबा**
**● विद्यार्थ्यांनी दिवाळीत फटाके न खरेदी करण्याची घेतली शपथ**

यावेळी सातशे पन्नास विद्यार्थ्यांनी फटाके न फोडण्याचा संकल्प केला. सूत्रसंचालन सतीश घाडगे यांनी कले. विद्यार्थ्यांनी शिक्षकांसोबत फटाके न खरेदी करण्याचा व पर्यावरण पुरक दिवाळी साजरी करण्याची शपथ घेतली. यावर्षी सणात फटाके न फोडन्याची शपथ घेतली.

यावेळी प्राचार्य सुरेश मोरे, पर्यवेक्षक भैरु फरड, सांस्कृतिक विभागाचे प्रमुख सुहास माळी, संजय शिंदे, अंकुश चोपडे, बाबासाहेब शळके, राजेंद्र शिंदे, आबासाहेब सरडे, आबासाहेब सोलंकर, गणेश राऊत, खुलचंद फडतरे, अजिंक्य काटकर, महादेव निंबाळकर, नवनाथ कांबळे, रवी सुर्वे,भालचंद्र जानराव, श्रीकांत पावणे, छगण जगदाळे, अतुल लोखंडे, अर्चना कुलकर्णी, अमृता मोरे, सुमन जाधव उपस्थित होते.

# बार्शी : राऊत गटाकडे तीन, सोपल गटाकडे चार ग्रामपंचायती

## घारी सरपंच सोपल गटाकडे; बहुमत राऊत गटाकडे

सुराज्य/बार्शी

बार्शी तालुक्यातील पाच ग्रामपंचायतींच्या तसेच पोटनिवडणुकींचा निकाल जाहीर झाला. विजयी उमेदवारांनी गुलालाची उधळण करत जल्लोष केला. या पाच ग्रामपंचायत पैकी भाजपा राऊत गटाने तीन ग्रामपंचायतींवर तर सोपल गटाने चार ग्रामपंचायतीवर दावा केला आहे. दरम्यान, आमदार राजेंद्र राऊत व माजी मंत्री दिलीप सोपल यांनी त्यांच्याकडे गेलेल्या विजयी उमेदवारांचा सत्कार केला.

तहसीलादर एफ. आर. शेख यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळी ९ वाजता मतमोजणीला सुरुवात झाली. तालुक्यातील अंबाबाईचीवाडी, घारी, चिंचोली / ढेंबरेवाडी, मुंगशी वा., उंडेगाव या पाच ग्रामपंचायतीसाठी एकूण १५ मतदान केंद्रावर मतदान प्रक्रिया पार पडली होती. अवघ्या एक तासांत मतमोजणीची प्रक्रिया पूर्ण झाली. तालुक्यातील भालगाव, चिखर्डे, तुळशीदासनगर येथील ग्रा. पं.च्या रिक्त झालेल्या सदस्यांच्या जागेसाठी पोटनिवडणूक झाली.

**विविध गांवचे विजयी सरपंचपदाचे तसेच सदस्यपदाचे विजयी उमेदवार पुढीलप्रमाणे :**

**चिंचोली ढेंबरेवाडी** : ग्रा. पं.सदस्यपदी विजयी - अजित शिंदे, अर्चना जाधव, राधाबाई काळेल, रोहिणी ढेंबरे, **उंडेगांव ग्रामपंचायत** : सरपंच पदी विजयी - प्रकाश गुंड सदस्यपदी विजयी : बाळासाहेब सलगर, जनाबाई जगताप, पुजा सलगर, संगिता जगताप,बालाजी जगताप, भास्कर पाटील, शाबीरा पठाण, **घारी ग्रामपंचायत** : सरपंचपदी विजयी : छाया काशीद, सदस्यपदी विजयी : गोरख शेळके, अनुराधा कांबळे, सुनिता जगदाळे, रामलिंग बसवंत, जयश्री घोंगडे, हेमा घावटे, रविकांत अडसूळ, ओंकार भंडारे, सोनाली बसवंत. **अंबाबाईचीवाडी ग्रामपंचायत :** सरपंचपदी विजयी : त्रिंबक कापसे, सदस्यपदी विजयी : परमेश्वर गलांडे, प्रियांका कापसे, अविनाश कापसे, श्रध्दा कापसे, वनमाला ढेंगळे. **मुंगशी वा ग्रामपंचायत :** सरपंचपदी विजयी : कल्पना क्षिरसागर, सदस्यपदी विजयी : विनोद तुपेरे, प्रगती क्षिरसागर, रोहिणी क्षिरसागर, अमोल क्षिरसागर, आशाबाई राक्षे, उज्वला खंबे, कल्पना क्षीरसागर. **तुळशीदासनगर पोटनिवडणूक** : विजयी सदस्य : विजयकुमार उबाळे, तुकाराम बिले, सोनाली पिंजारी . **भालगांव पोटनिवडणूक** : विजयी सदस्य : सचिन सोनवणे, चिखर्डे पोटनिवडणूक : विजयी सदस्य : अमित कोंढारे. **आमदार राजेंद्र राऊत व माजी मंत्री सोपल गटाचे दावे-प्रतिदावे.** उंडेगाव, आंबाबाईची वाडी आणि चिंचोली-ढेंबरेवाडी या तीन ग्रामपंचायतींवर भारतीय जनता पार्टीने (राऊत गटाने) विजय मिळविला असल्याचा तसेच मुंगशी वा येथे ९ पैकी ४ सदस्य भाजपाचे आल्याचे तसेच घारी येथे ९ पैकी ६ सदस्य भाजपाचे आले असल्याचे त्याचबरोबर पोटनिवडणूकीत भालगाव - १, चिखर्डे - १ व तुळशीदास नगरमधील ३ जागांवरदेखील विजय मिळविल्याचा दावा आमदार राजेंद्र राऊत यांनी केला आहे. ५ ग्रामपंचायतीतील सदस्यपदाच्या एकूण ३९ जागांपैकी ३० जागा व पोटनिवडणूकीत ३ गावांतील ५ सदस्य आपल्या गटाचे असल्याचा दावा देखील राऊत गटाने केला आहे. तर बार्शी तालुक्यातील निवडणुक झालेल्या चारही ग्रामपंचायतींचे सरपंच व सत्ता सोपल गटाने काबिज केल्याची माहिती माजी मंत्री दिलीप सोपल यांनी दिली. घारी ग्रामपंचायतीच्या सरपंच पदी छाया काशिद, उंडेगाव ग्रामपंचायतीच्या सरपंच पदी प्रकाश गुंड, मुंगशी ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी कल्पना क्षीरसागर, अंबाबाईची वाडी ग्रामपंचायतीच्या सरपंच पदी त्रिंबक कापसे यांची निवड झाली आहे. निवडी नंतर विजयी सरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांनी औद्योगिक वसाहतीचे चेअरमन सुधिर सोपल यांच्या समवेत सोपल बंगला येथे आनंदोत्सव साजरा केला. चिंचोली ढेंबरेवाडी ग्रामपंचायत सरपंच पदी अमर कसबे यांची बिनविरोध निवड झाल्याचे त्यांनी म्हटले आहे.

**गड आला पण सिंह गेला**

घारी येथे सोपल व राऊत गटात चुरशीची लढत झाली. सदस्यांच्या एकूण ९ जागांपैकी ६ जागा राऊत गटाने जिंकल्या तर ३ जागा सोपल गटाने जिंकल्या. सरपंचपदासाठी सोपल गटाचे नेते नंदकुमार काशीद यांच्या पत्नी छाया काशीद विरूध्द राऊत गटाकडून उषा बसाटे यांच्यात चुरशीची लढत झाली. यात छाया काशीद या ६५ मतांनी विजयी झाल्या. राऊत गटाकडे बहुमत असले तरी सरपंचपदाचा उमेदवाराचा पराजय झाल्याने येथे राऊत गटासाठी गड आला पण सिंह गेला अशी अवस्था झाली.

### मंगळवेढा : २१ ग्रामपंचायतींवर निर्विवाद वर्चस्व; शिवानंद पाटील यांचा दावा

# प्रशांत परिचारक प्रणित समविचारी गटाची सत्ता

✔ सुराज्य/पंढरपूर

मंगळवेढा तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत मानेवाडी, रेवेवाडी, लोणार, पडोळकरवाडी, जालिहाळ-सिध्दनकेरी, लक्ष्मीदहीवडी, आंधळगांव, जंगलगी, चिक्कलगी, खडकी, भाळवणी, निंबोणी, शेलेवाडी, अकोला, देगांव, रड्डे, डिकसळ, शिरसी, खुपसंगी, जुनोनी व बिनविरोध ब्रम्हपुरी या २१ ग्रामपंचायतींवरती माजी आमदार प्रशांत परिचारक प्रणित समविचारी गटाचा सत्ता आल्याचा दावा संत दामाजी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन शिवानंद पाटील यांनी केला आहे.

नवनिर्वाचित सरपंच व ग्रामपंचायत सदस्यांचा सत्कार माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या संपर्क कार्यालयासमोर करण्यात आला. यावेळी संत दामाजी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन शिवानंद पाटील, व्हाईस चेअरमन तानाजी खरात, जिल्हा नियोजन मंडळाचे माजी सदस्य युन्नुस शेख, दामाजी शुगरचे संचालक औदुंबर



वाडदेकर, बसवराज पाटील, सुरेश कोळेकर, राजेंद्र पाटील, गौरीशंकर बुरकूल, महादेव लुगडे, गोपाळ भगरे, रेवणसिध्द लिगाडे यांच्या हस्ते सत्कार झाला. याप्रसंगी माजी पं.स.माजी उपसभापती काशिनाथ पाटील, दामाजी शगरचे माजी संचालक भारत पाटील, मा. आ. प्रशांतरावजी परिचारक युवा मंचचे अध्यक्ष बबलू सुतार, माधवानंद आकळे, दामाजी शुगरचे संचालक गौडाप्पा बिराजदार, बाबासो पडोळकर, दामाजी शुगरचे संचालक दिगंबर भाकरे, माजी. जि.प.सदस्य शिवाजीराव नागणे, महादेव माळी, काशिनाथ पाटील, मंगळवेढा सहकारी सूत गिरणीचे संचालक पप्पू स्वामी, दिलीप राजमाने, अनिल पाटील, प्रकाश जुंदळे, श्रीकांत साळे, सिध्देश्वर मेटकरी, लक्ष्मण आमुंगे, शिवाजी वाघमोडे, शिवाजी पडोळकर, तानाजी कांबळे, सहदेव लवटे, भाऊसो रेवे, शशिकांत कस्तुरे, सिदमल चौगुले, महासिध्द चौगुले, नितीन पाटील, रामभाऊ माळी, जगू इंगळे, मारुती माळी, दीपक चव्हाण, सचिन चौगुले, लक्ष्मण गायकवाड, पांडुरंग चौगुले, संजयसिंग रजपूत, अशोक जाधव उपस्थित होते.



मोहोळः मोहोळ तालुक्यातील ग्रामपंचायत निवडणुकीत विजयी जल्लोष करताना विजयी उमेदवारांसह सदस्य, पदाधिकारी, ग्रामस्थ.

## मलीकपेठ निवडणुकीमध्ये नागेश साठे यांचे वर्चस्व

✔ **मोहोळ** : मोहोळ तालुक्यात झालेल्या दोन ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक आणि पाच गावांच्या पोटनिवडणुकीत स्थानिक विकास आघाड्यांनी यश मिळवले आहे. तालुक्याचे लक्ष लागून राहिलेल्या मलीकपेठ ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत मोहोळ तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती नागेश साठे यांनी आपले वर्चस्व कायम राखले आहे.

मलीकपेठ ग्रामपंचायत निवडणुकीसाठी दोन गटात थेट सामना झाला. यामध्ये नागेश साठे गटाला नऊपैकी सहा जागा आणि सरपंच पदाचा उमेदवार विजयी झाला. सरपंच पदासाठी झालेल्या लढतीत गणेश जगताप यांनी विरोधी आघाडीचे जयदीप दाइंगडे यांचा १६० मतांनी पराभव केला. गणेश जगताप यांना ११५८ तर जयदीप दाइंगडे यांना ९९८ मते मिळाली. जामगाव खुर्द ग्रामपंचायतीमध्ये सात सदस्य यापूर्वीच बिनवरोध निवडले गेले. मात्र येथे सरपंच पदासाठी दोन उमेदवारामध्ये थेट लढत झाली. यामध्ये पपिता दत्तात्रय फडतरे यांनी बाबू गेना फडतरे यांचा १३५ मतांनी पराभव केला. मिरी येथील सरपंच गोपीचंद तडसरे यांच्या निधनाने रिक्त झाल्याने घेतलेल्या पोटनिवडणुकीत प्रकाश तडसरे विजयी झाले आहेत.त्यांनी सुवर्णा गोपीचंद तडसरे यांचा ५३ मतांनी पराभव केला.याठिकाणी आता प्रकाश तडसरे यांची सरपंचपदी निवड निवड निश्चित मानले जात आहे.

मलिकपेठ ग्रामपंचायतच्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक-एकमधून लिंगादेव दादाराव काळे (४३५), नागेश औदुंबर हजारे (४४९), विद्या रजनीश कसबे (४४३), प्रभाग क्रमांक-दोन मधून बालाजी पांडुरंग हजारे (४७१), मनिषा नानासाहेब चवरे (४७५), सुजाता तानाजी ढवळे (४७१), प्रभाग क्रमांक-तीनमधून पांडुरंग नामदेव साठे (४२१), सुवर्णा संभाजी हजारे (४२६), जयश्री अण्णासाहेब कसबे (४२१), पोटनिवडणुकीत तांबोळे या ग्रामपंचायतीतून छाया शिवाजी कोकाटे (४१४), हिंगणी नि. येथून शुभांगी रामदास थिटे (३४०), डिकसळमधून श्रीमंत जंगल जाधव (२३०) हे विजयी झाले आहेत.

# आ. समाधान आवताडे यांचे एकहाती वर्चस्व

### मंगळवेढा तालुक्यातील तब्बल २७ पैकी १३ ग्रामपंचायतींवर भाजपाचा विजयी झेंडा



पंढरपूर : मंगळवेढा तालुक्यातील ग्रामपंचायत निवडणुकीत भारतीय जनता पार्टीचे आमदार समाधान आवताडे यांच्या गटाने विजयी बाजी मारली. आ. समाधान आवताडे यांच्या कार्यालयासमोर जल्लोष करताना विजयी उमेदवार दिसत आहेत.

✔ सुराज्य/पंढरपूर

मंगळवेढा तालुक्यातील एकूण २७ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक पंचवार्षिक निवडणुकांमध्ये पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे भारतीय जनता पार्टीचे आमदार समाधान आवताडे यांच्या नेतृत्त्वाखाली तब्बल २७ पैकी १३ ग्रामपंचायतींवर आपले एकहाती वर्चस्व राखत विजयाचा झेंडा फडकवला आहे.

सर्व विजयी नूतन पदाधिकाऱ्यांचा आमदार जनसंपर्क कार्यालय मंगळवेढा येथे कृषी बाजार समितीचे माजी सभापती सोमनाथ आवताडे यांच्या हस्ते, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य प्रदीप खांडेकर यांच्या उपस्थितीमध्ये सत्कार करण्यात आला. यावेळी सरपंच विनायक यादव, विजय माने, माजी संचालक पप्पू काकेकर, भारत निकम, सरपंच शिवाजी सरगर आदींनी विजयी उमेदवारांचे अभिनंदन केले.

**आवताडे यांच्या नेतृत्त्वाला पसंती**

या निवडणुकीमध्ये आ. आवताडे यांच्या नेतृत्त्वाखाली जुनोनी, देगाव, अकोले, बठाण उचेठाण, महमदाबाद हु., जंगलगी, मुंढेवाडी, लमाणतांडा, लक्ष्मीदहिवडी, नंदूर, हिवरगांव, निंबोणी या स्थानिक स्वराज्य संस्थांवर आ. आवताडे यांच्या राजकीय विचारांच्या शिलेदारांनी एकहाती विजयाची कमान उभी केली आहे. उर्वरित खडकी, शेलेवाडी, भाळवणी, खुपसंगी, रड्डे, जालिहाळ, ब्रह्मपुरी या सात ग्रामपंचायतवर आ. आवताडे यांच्या गटातील उमेदवारांनी स्थानिक पातळीवर आघाड्या करुन सदस्य पदावर आपली विजयी बाजी मारली आहे.

# पंढरपूर, मंगळवेढा तालुक्यात अभिजित पाटील गटाची बाजी

✔ सुराज्य/पंढरपूर

पंढरपूर तालुक्यातील दोन तर मंगळवेढा तालुक्यातील २७ ग्रामपंचायतींमध्ये पंचवार्षिक निवडणूक लागली असता श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन तथा राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते अभिजीत पाटील यांनी काही ठिकाणी स्वतंत्र पॅनल तर काही ठिकाणी समविचारींच्या माध्यमातून आपला पॅनल उभा केला होता. यातूनच अभिजीत पाटलांना पंढरपूर, मंगळवेढा तालुक्यातील ग्रामपंचायत निवडणुकीत घवघवीत यश प्राप्त झालेले दिसून येत आहे.

पंढरपूर तालुक्यातील गुरसाळे, ईश्वर वठार येथे सरपंच पदाचे उमेदवार निवडून आले आहेत. तर मंगळवेढा तालुक्यात काही ठिकाणी सरपंच तर काही ठिकाणी ग्रामपंचायत सदस्य पदाची बाजी अभिजीत पाटील गटाने मारली आहे.

मंगळवेढा तालुक्यातील लक्ष्मी दहिवडी, खडकी, देगाव, शिरशी, शेलेवाडी, डिसकळ, निबोंणी, मानेवाडी, रेड्डे, आंधळगाव, खुपसंगी या ग्रामपंचायतींमध्ये आपले पॅनल निवडून आल्याबद्दल उमेदवारांचे अभिनंदनपर सत्कार श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांच्या संपर्क कार्यालयात करण्यात आले.

**बबनदादा शिंदे गटाला मोठा धक्का**

गुरसाळे ग्रामपंचायतीवर राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे अभिजीत पाटील यांच्या नेतृत्त्वाताखाली सत्ता आली. या दोन्ही ग्रामपंचायतीवर आमदार बबनदादा शिंदे यांच्या स्थानिक गटाला मोठा धक्का बसल्याचे दिसून आले. गुरसाळे ग्रामपंचायतीवर दीपक शिंदे, नारायण देशमुख हे ईश्वरवाठार ग्रामपंचायतीवर सरपंच पदावर निवडून आले आहेत.



पंढरपूरः ग्रामपंचायत निवडणुकीत पंढरपूर, मंगळवेढा तालुक्यात शरद पवार गटाचे अभिजित पाटील यांनी बाजी मारली आहे. विजयानंतर जल्लोष करताना अभिजित पाटील यांच्यासह नूतन सरपंच, सदस्य, कार्यकर्ते, समर्थक दिसत आहेत.

## गुरसाळे ग्रामपंचायत निवडणूक; समविचारी आघाडीची सत्ता



पंढरपूर : गुरसाळे ग्रामपंचायत निवडणुकीतील विजयी उमेदवार जल्लोष करताना दिसत आहेत.

✔ **पंढरपूर** : गुरसाळे (पंढरपूर) येथे झालेल्या ग्रामपंचायत पंचवार्षिक निवडणुकीमध्ये परिचारक व पाटील यांनी पाठिंबात दिलेले सरपंच पदाचे उमेदवार दीपक शेठ शिंदे हे ५५५ मतांनी विजयी झाले आहेत.

समविचारी आघाडीमध्ये माझी आमदार प्रशांत परिचारक व अभिजीत पाटील यांच्या आघाडीने कब्जा मिळवलेला आहे. या आघाडीने दहा जागांवर विजय मिळवत सत्ता प्राप्त केली आहे. विजयानंतर बोलताना नूतन सरपंच दीपक शिंदे म्हणाले, प्रशांत परिचारक व अभिजीत पाटील यांनी दिलेल्या पाठिंबा माझा विजय झाला आहे.

# टेंभुर्णी : आ.शिंदे यांच्या गटाला धक्का

### बोबडे गटाला दहा, देशमुख गटाला सहा, कुटे गटाला एक जागा

**भाजपचा वरचष्मा, देशमुख गटाची चांगली सलामी**

✔ सुराज्य/टेंभुर्णी

टेंभुर्णी ग्रामपंचायत निवडणुकीत आमदार शिंदे यांच्या गटाला मोठा धक्का बसला असून, भाजपचा वरचष्मा राहिला आहे. देशमुख गटाने चांगली विजयी सलामी दिली आहे. बोबडे गटाला दहा, देशमुख गटाला सहा, कुटे गटाला एक जागा मिळाली आहे. टेंभुर्णी ग्रामपंचायत सरपंचपदी सुरजा योगेश बोबडे यांची जनतेमधून निवड झाली. चालू ग्रामपंचायतच्या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये बोबडे पार्टीला हे मोठे यश म्हणावे लागेल.



सुरजा बोबडे

या ग्रामपंचायतीच्या निवडणुकीमध्ये (राष्ट्रवादी काँग्रेस) जन परिवर्तन आघाडी देशमुख पार्टी या गटाला चांगले यश मिळाले असून, (राष्ट्रवादी काँग्रेस) कुटे गटाला मोठा धक्का बसल्याचे दिसत आहे. भाजपचे योगेश बोबडे गटाला सरपंच पदासह दहा जागांवर विजय मिळाल्याने आनंद उत्सव साजरा होताना दिसत आहे.

जन परिवर्तन आघाडी देशमुख पार्टीने सलामीलाच आपले सहा उमेदवार या ग्रामपंचायतींमध्ये पाठवून रणसिंग फुंकल्याचे बोलले जात आहे. टेंभुर्णी ग्रामपंचायतची सत्ता बोबडे पार्टीकडे गेल्याने टेंभुर्णीमध्ये व बोबडे पार्टीमध्ये उत्साहाचे वातावरण दिसत आहे. गेल्या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये बोबडे पार्टीला सरपंच पदाने थोड्या फरकाने हुलकावणी दिल्याने चालू पंचवार्षिक निवडणुकीमध्ये बोबडे पार्टी आपला गड राखण्यात यशस्वी झाल्याचे दिसत आहे. बोबडे पार्टीकडे दहा जागा, जन परिवर्तन देशमुख आघाडी सहा जागा, कुटे पार्टी या गटाला एका जागेवर समाधान मानावे लागले. या निवडणुकीच्या निकालांमध्ये तीनही पार्टीतील मातंबरांना पराभवाला सामोरे जावे लागले आहे.



टेंभुर्णी : टेंभुर्णी ग्रामपंचायत निवडणुकीत जल्लोष करताना विजयी उमेदवार.

बोबडे पार्टीतील सरपंचासह विजयी उमेदवारांची विजयी मिरवणूक टेंभुर्णी शहरामधून काढण्यात आली.

एकूण १७ जागेसाठी वॉर्डावाईज ही निवडणूक झाली.

वॉर्ड क्रमांक-१ मध्ये कैलास भिकाजी सातपुते ९३७, नागनाथ सोपान वाघे ८१४, श्यामल तुकाराम डोके ९२०, वॉर्ड क्रमांक-दोनममध्ये लखन विजय हवालदार ८३७, विद्या शैलेश ओहोळ १०४७, रूपमती राजाराम थोरात १०३५, वॉर्ड क्रमांक-तीन मध्ये राजश्री सतीश नेवसे ५९३, मुक्ताबाई गुरुलिंग पाटील ५७९, वॉर्ड क्रमांक - चारमध्ये ऋषिकेश मोहन बोबडे ८३०, सचिन निळकंठ होदाडे ५७८, सुनंदा सिद्धेश्वर तांबे ७२१, वार्ड क्रमांक पाच बाळासाहेब आजिनाथ ढगे १०३९, प्रतिभा परमेश्वर खरात १०७७, सईबाई वैभव देशमुख ११८०, वॉर्ड क्रमांक-सहामध्ये अमर महादेव कांबळे ८६६, प्रमोद प्रभाकर कुटे ८१६, आरती लखन पवार ९०० मतांनी विजयी झाले आहेत.

**बोबडे १४७१ मतांनी विजयी**

सरपंच पदासाठी सुरजा योगेश बोबडे यांनी कोमल गणेश केचे व मनीषा विलास देशमुख यांच्यावर मात करून त्या १४७१ मतांनी विजयी झाल्या. बोबडे यांना ५०७४ तर केचे यांना ३६३३ तसेच देशमुख यांना २४०० मते मिळाली.

# लवंग ग्रामपंचायतीवर पाटील-भिलारे गटाची सत्ता

✔ सुराज्य/माळीनगर

अत्यंत चुरशीच्या लढाईत लवंग (माळशिरस) ग्रामपंचायतीवर निशांत पाटील, उत्तम भिलारे, उत्तम मोलाणे, रामदादा चव्हाण,शिवाजी वाघ गटाची सत्ता येऊन जनतेतील सरपंच म्हणून प्रशांत विजयकुमार पाटील यांची निवड केली आहे. एकूण १३ सदस्य व सरपंचपदासाठी १ अशा १४ जागांसाठी निवडणूक लागली होती.

या निवडणुकीत सरपंचपदासाठी प्रशांत विजयकुमार पाटील यांच्यासह वॉर्ड क्रमांक-१ मधून प्रशांत भिलारे, नंदादेवी वाघ, तानाजी रणसिंग, वॉर्ड क्रमांक-२ मधून सीताराम वाघ, वैशाली चव्हाण, अंजली गायकवाड, वॉर्ड क्रमांक-३ मधून शंभुराजे पाटील, महानंदा चव्हाण, वॉर्ड क्रमांक-४ मधून अर्चना चव्हाण, यशवंत गेजगे, वॉर्ड क्रमांक- ५ मधून रुपाली भारत शिंदे, विशाखा विराजसिंह मोहिनी कांबळे, छाया दळवी, सज्जन दुरापे हे विजयी झाले आहेत. पाटील-भिलारे गटाने ६ जागा, वाघ मोलाणे गटाने ७ जागांवर विजय विजय मिळवला.



माळीनगर : लवंग ग्रामपंचायतीवर सत्ता मिळवल्यानंतर अभिनंदन करताना जयसिंह मोहिते-पाटील, धैर्यशील मोहिते-पाटील, विजयकुमार पाटील, धनाजी चव्हाण, दत्तात्रय भिलारे, रामदादा चव्हाण, निशांत पाटील आदी.



अनुपमा एकतपुरे



प्रशांतकुमार पाटील

या निवडणुकीत वॉर्ड क्रमांक -१ मधून रुपाली भारत शिंदे, विशाखा विराजसिंह निंबाळकर, अभिजीत सुखदेव वजाळे, वॉर्ड क्रमांक-२ मधून मच्छिंद्र दत्तू हजारे, लक्ष्मण मारुती डोईफोडे, शांताबाई नागनाथ गेजगे, वॉर्ड क्रमांक-३ मधून नंदा रमेश देवकर, अनिल भानुदास सकट, वॉर्ड क्रमांक-४ मधून आसमा रियाज मुलाणी, चांदणी विशाल वजाळे, प्रदीपकुमार सुभाष निंबाळकर, वॉर्ड क्रमांक-५ मधून जयश्री किसन जाधव, रुपाली सतीश तूपसौंदर्य, अतुल नवनाथ कांबळे, वॉर्ड क्रमांक-६ विराजसिंह प्रकाश निंबाळकर, अमोल विजय साठे, सोनाली आदेश लोंढे आदी उमेदवार विजयी झाले.

**माळीनगर ग्रामपंचायतीवर निंबाळकरांची सत्ता**

माळीनगरः बहुप्रतीक्षित माळीनगर ग्रामपंचायतीवर परिवर्तन पॅनलच्या निंबाळकरांची सत्ता आली आहे. पंचायत समितीचे माजी सभापती तथा माळीनगर परिवर्तन पॅनलचे पॅनलप्रमुख सुभाष निंबाळकर, प्रचार प्रमुख हेमंत रासकर, समीर पांढरे, कल्पेश पांढरे, निलेश बोरावके, डॉ. अविनाश जाधव, घनश्याम भोंगळे, राजीव नवले, कुणाल इनामके यांच्या नेतृत्त्वाखाली परिवर्तन पॅनलने जोरदार मुसंडी मारून वर्चस्व प्रस्थापित केले.

# ईश्वर वठारमध्ये ३५ वर्षांच्या सत्तेला सुरुंग !

## माऊली हळणवर यांनी फिरविली भाकरी

## माजी झेडपी सदस्याला होम पीचवर चारली धूळ

सुराज्य/पंढरपूर

पंढरपूर तालुक्यातील ग्रामपंचायत निवडणुकीत भाजप किसान मोर्चाचे प्रदेश सचिव माऊली हळणवर यांच्या नेतृत्त्वाखाली संत बाळुमामा ग्रामविकास परिवर्तन पॅनलने ३५ वर्षांच्या सत्तेला सुरुंग लावत विजयावर शिक्कामोर्तब केले.

ईश्वर वठारमध्ये माजी जि. प. सदस्य सुभाष माने यांच्या गटाची मागील ३५ वर्षांपासून सत्ता होती. पॅनल प्रमुख माऊली हळणवर यांच्या पाठीवर माजी आमदार प्रशांतराव परिचारक, आ. गोपीचंद पडळकरांनी हात ठेवल्याने मागील ३५ वर्षांपासूनच्या सत्तेला सुरुंग लावण्यात संत बाळुमामा परिवर्तन आघाडीला यश आले. ४ सदस्यांसह सरपंचपदी नारायण देशमुख यांची २९३ इतक्या बहुमतांनी सत्ता हस्तगत केली. यात संत बाळुमामा परिवर्तन आघाडीने ४ सदस्यांसह सरपंचपद मिळवले तर ३ सदस्यांचा निसटता पराभव झाला.

विजयी उमेदवारांमध्ये विजय आण्णासो मेकटरी, लक्ष्मी सुदर्शन पांढरे, रंजना बाळासाहेब खांडेकर, रुक्मिणी अर्जुन घोडके यांचा समावेश आहे. माने गटाचे तीन सदस्य विजयी झाले.

यावेळी रासपचे पंकज देवकते, प्रा. सुखदेव धुपे, नागनाथ हळणवर, शिवसेनेचे महावीर देशमुख, सदाशिव मेकटरी, ज्ञानेश्वर गुंडगे, युवराज पाटील, अर्जुन घोडके, नानासाहेब चौगुले, रवींद्र ठवरे आदी उपस्थित होते.



पंढरपूर : पंढरपूर तालुका ग्रामपंचायत निवडणुकीत विजयी जल्लोष करताना ईश्वर वठारमधील विजयी उमेदवार.

### हा विजय मतदारांचा

मागील अनेक वर्षे ग्रामपंचायतीवर प्रस्थापितांची सत्ता होती. पंचायत समितीचे सभापती, जिल्हा परिषद सदस्य एवढी पदे असताना सरपंच पदही स्वतःच्याच घरात घेतले होते. परंतु सत्तेचे विकेंद्रीकरण झाले पाहिजे. सर्वसामान्यांना सत्तेतील पदे मिळाली पाहिजेत. यासाठी संत बाळुमामा परिवर्तन आघाडीच्या माध्यमातून पॅनल उभे केले. याला सर्व मतदारांनी सहकार्य केले. त्यामुळे हा विजय मतदारांना समर्पित करत आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, माजी आ. प्रशांतराव परिचारक, आ. गोपीचंद पडळकर यांच्या माध्यमातून यापुढे गावाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहे.

**- माऊली हळणवर, पॅनल प्रमुख, ईश्वर वठार.**

# आमदार शहाजीबापू पाटील यांना 'चिकमहूद'ची सत्ता राखण्यात यश

## ग्रामपंचायत निवडणुकीत शेकाप, मित्रपक्षाचा वरचष्मा

सुराज्य/सांगोला

आमदार शहाजीबापू पाटील यांनी स्वतःच्या गावी चिकमहूद ग्रामपंचायतीची सत्ता राखण्यात यश मिळविले आहे. ग्रामपंचायतीच्या १४ पैकी १३ जागा आमदार पाटील यांच्या पॅनेलने जिंकल्या आहेत. गावची ग्रामपंचायत राखली असली तरी तालुक्यातील इतर सावे, वाढेगाव, खवासपूर या ३ ग्रामपंचायती शेतकरी कामगार व मित्रपक्षाने जिंकल्या आहेत.

सांगोला तालुक्यात चिकमहूद, खवासपूर, वाढेगाव आणि सावे या चार ग्रामपंचायतींची निवडणूक जाहीर झाली होती. या ग्रामपंचायतीची चुरशीने ८३.३७ टक्के मतदान झाले होते. चिकमहूद ग्रामपंचायतीवर पाटील यांनी सत्ता राखली असली तरी चिकमहुद ग्रामपंचायत सोडली तर सावे ग्रामपंचायत शेकाप, खवासपूर ग्रामपंचायत राष्ट्रवादी काँग्रेसच्या पाठिंब्याने शेकाप तसेच वाढेगाव ग्रामपंचायतीवर शेकाप शिवसेना शिंदे गटाने आपली सत्ता खेचून आणली आहे.

वाढेगाव ग्रामपंचायतीवर माजी आमदार दीपकआबा साळुंखे पाटील यांची सत्ता होती. या ग्रामपंचायतीमध्ये शेतकरी कामगार पक्ष यांनी बाजी मारली असून, सरपंचपदासह १३ जागांपैकी ७ जागा जिंकल्या आहेत. यामुळे राष्ट्रवादीची ग्रामपंचायत शेकापने स्वतःकडे खेचून आणली आहे. शेकाप व शिवसेना शिंदे गटाच्या कोमल सुरेश डोईफोडे यांनी सरपंचपदाच्या निवडणुकीत विजय मिळविला. वाडेगाव येथे शेकापाला शिवसेनेच्या पाटील यांच्या एका गटाने पाठिंबा दिला होता. सावे ग्रामपंचायत ही पारंपरिक शेकापचा गड मानला जातो. गेल्या अनेक वर्षांपासून या गावात शेतकरी कामगार पक्षाची सत्ता होती. ती या वेळीही त्यांनी टिकवली आहे. शेतकरी कामगार पक्षाच्या दोन गटांतच यावेळी लढत झाली होती. असे असूनही सावे ग्रामपंचायतीमध्ये शेकापने (शेजाळ गट) बाजी मारली आहे. शेकापचे (शेजाळ गट) शिवाजी भैरु वाघमोडे यांनी सरपंचपदाच्या निवडणुकीत विजय मिळविला. खवासपूर ग्रामपंचायत मागील दोन पंचवार्षिकपासून आमदार पाटील गटाकडे होती. या निवडणुकीत मात्र शेकापने सरपंचपदासह १०-१ अशी सत्ता मिळविली आहे. शेकापचे गणेश वसंत दिक्षीत यांनी सरपंचपदाच्या निवडणुकीत विजय मिळविला. खवासपूर निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने शेकापला पाठिंबा दिला होता खवासपूर ग्रामपंचायतीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने शेतकरी कामगार पक्षाला पाठिंबा दिला. वाढेगाव ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत शिवसेनेच्या एका गटाने शेतकरी कामगार पक्षाबरोबर तर दुसर्‍या गटाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाबरोबर युती केली होती. खवासपूर आणि वाढेगाव या दोन्ही ग्रामपंचायतीच्या निवडणुकीमध्ये शहाजीबापू पाटील, दीपकआबा साळुंखे यांचे कार्यकर्ते एकमेकांविरुद्ध भिडल्यामुळे या दोन्ही ग्रामपंचायतींमध्ये शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला पराभवाची धूळ चाखावी लागली आहे.



चिकमहुद ग्रा. पं. निवडणुकीत विजयी उमेदवारांचा सत्कार करताना ॲड. शहाजीबापू पाटील.

### चिकमहूदमध्ये १४ जागांसाठी झाले मतदान

चिकमहूद ग्रामपंचायतीत एकूण १५ जागांपैकी निवडणुकीच्या दरम्यान एका उमेदवाराचा ह्रदयविकाराच्या धक्क्याने मृत्यू झाला. त्यामुळे १४ जागांसाठी मतदान झाले होते. या १४ पैकी १३ जागा आमदार शहाजी पाटील यांच्या गटाने जिंकल्या आहेत.एक जागा विरोधकांना मिळविण्यात यश आले आहे. सरपंचपदही शहाजीबापू पाटील गटाने जिंकले आहे. शिवसेना (शिंदे) गटाच्या शोभाताई सुरेश कदम यांनी सरपंचपदावर बाजी मारली.



पंढरपूर: गुरसाळे ग्रामपंचायतीवर विठ्ठल कारखान्याचे अध्यक्ष अभिजीत पाटील, माजी आमदार प्रशांत परिचारक गटाने बाजी मारली. विजयाचा जल्लोष करताना विजयी उमेदवार.

# ...तब्बल चाळीस वर्षांनंतर

# गुरसाळे ग्रामपंचायतीवर पाटील, परिचारक गटाची बाजी

सुराज्य/पंढरपूर


तालुक्यातील गुरसाळे ग्रामपंचायतीवर विठ्ठल कारखान्याचे अध्यक्ष अभिजीत पाटील आणि माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या गटाने बाजी मारत चाळीस वर्षांनंतर येथे आपला झेंडा फडकावला तर ईश्वर वठार ग्रामपंचायतीमध्ये असणारी माजी आमदार प्रशांत परिचारक आणि आमदार बबन शिंदे यांच्या गटाचे माने बंधुची पंचवीस वर्षांची सत्ता भाजपाचे पदाधिकारी माउली हळणवर यांनी संपुष्टात आणली.

तालुक्यातील तीन गावांमध्ये पंचवार्षिक निवडणूक जाहीर झाली होती. यामध्ये पुळूज ग्रामपंचायत बिनविरोध झाली. तर दोन गावांमध्ये चुरशीने मतदान होऊन सत्तांतर झाले. गादेगाव येथील एका जागेच्या पोटनिवडणुकीमध्ये समस्त ग्रामस्थांच्या वतीने देण्यात आलेला उमेदवार रवींद्र सिध्दनाथ बागल (५९०) यांनी ४८४ मतांनी विजय मिळवला.

दरम्यान गुरसाळे ग्रामपंचायतीमध्ये परिचारक व पाटील गटाने समविचारी आघाडी स्थापन केली होती. या आघाडीने सरपंच पदासह १५ पैकी १० जागांवर विजय मिळवला. तर भालके, काळे यांच्या समर्थकांनी स्थापन केलेल्या पंचगंगा ग्रामविकास आघाडीस तीन जागा तर महादेव पाटील गटास दोन जागा मिळाल्या. या ठिकाणी चाळीस वर्षा नंतर सत्तांतर झाले आहे. तर ईश्वर वठार ग्रामपंचायतीसाठी जोरदार चुरस होती. या ठिकाणी वामनराव माने व सुभाषराव माने यांची पंचवीस वर्षाहून अधिक काळापासून सत्ता होती. मात्र भाजपाचे पदाधिकारी माउली हळणवर व ग्रामस्थांनी एकत्र येत संत बाळुमामा ग्रामविकास आघाडीने येथे सरपंच पदासह सात पैकी चार जागांवर विजय मिळवला. विशेष म्हणजे हे सत्ताधारी व विरोधी दोन्ही गट परिचारक आघाडीचे आहेत.

### विजयी उमेदवार

ईश्वर वठार, सरपंच : नारायण भगवान देशमुख ८०० मते, **सदस्य :** रामहरी लोंढे २९९ मते, सद्‌गुरु मेटकरी २५९, स्वाती खांडेकर २७२, रंजना खांडेकर २९३, लक्ष्मी पांढरे २८७, विजय मेटकरी २२७, रुक्मिणी घोडके २०५, **गुरसाळे सरपंच :** दीपक रामचंद्र शिंदे १४५४ मते, सदस्य : अशोक रणपिसे २८३, पूजा कोळेकर ३६७, संदिशा कोळेकर ३७६, अनिल खरात ३४१, शंकर कवडे ३२३, मुक्ताई' जाधव ३४७, अमोल वायमारे १६५, विजय भोसले १५४, नागरा खरात १७२, रामेश्वर माने ३२०, ताराबाई वायमारे २९१, मनिषा शिरतोडे ३३८, शरदचंद्र गायकवाड २५३, शेवंता घुटुकडे २७९, लिना देवकते २४८.



दक्षिण सोलापूर : दक्षिण सोलापूर तालुक्यात विजयानंतर उमेदवारांचा सत्कार करताना आमदार सुभाष देशमुख.

# दक्षिणमध्ये अनेक गावांमध्ये परिवर्तनाची लाट

सुराज्य/दक्षिण सोलापूर

दक्षिण सोलापूर तालुक्यातील झालेल्या ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत अनेक गावांमध्ये परिवर्तन झाले. सर्वांचे लक्ष लागलेल्या कासेगाव, उळे आणि वळसंग ग्रामपंचायतीमध्ये अनेक वर्षानंतर परिवर्तन झाल्याचे पाहायला मिळाले. कुसुरमध्ये भाजपने पुन्हा सत्ता मिळवली तर गावडेवाडी मात्र पराभव झाला. उपविभागीय अधिकारी विठ्ठल उदमले, दक्षिणचे तहसीलदार किरण जमदाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत दक्षिण तहसील कार्यालयमध्ये सकाळी आठ वाजता ग्रामपंचायतीसाठी मतमोजणीला सुरुवात झाली. सर्वांचे लक्ष लागलेल्या कासेगाव आणि वळसंग या दोन ग्रामपंचायतीसाठी शेवटी मतमोजणी झाली. कासेगावमध्ये माजी सरपंच दिवंगत नेते श्रीकांत वाडकर यांचे चिरंजीव यशपाल वाडकर एक हजारांहून अधिक मताधिक्याने विजय मिळवला. त्यांनी आपले प्रतिस्पर्धी शंकर वाडकर यांचा पराभव केला. त्यापैकी नऊ जागा जिंकण्यात श्री शंभू महादेव परिवर्तन पॅनलला यश आले.

यावेळी उळे ग्रामपंचायतीमध्ये सत्तांतर झाले. मनोज गुंड या युवकाच्या नेतृत्त्वाला पसंदी देण्यात आली. त्यांनी सर्व जागा जिंकून एक हाती सत्ता मिळवली आहे. या ठिकाणी अंबिका कोळी या सरपंच पदावर विजयी झाल्या. औज ग्रामपंचायत निवडणुकीत सरपंच पदासाठी झालेल्या अटीतटीच्या निवडणुकीत कविता भारत रुपनवरे या एक मताने विजयी झाल्या आहेत. दक्षिण सोलापूर तालुक्यातील नऊ ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाची निवड झाली आहे. उळे ग्रापंचायत सरपंचपदाचे उमेदवार अंबिका दशरथ कोळी (नामाप्र) यांना १४१२ मते मिळाली. कासेगावात यशपाल श्रीकांत वाडकर (सर्वसाधारण) १९०८ मतांनी विजयी झाले. दोड्डी ग्रामपंचायत निवडणुकीत महेश व्यंकटराव पाटील (नामाप्र) यांना ९७० मते मिळाली. गावडेवाडीत संगिता कैलास पांढरे (सर्वसाधारण) ३७८ मतांनी विजयी झाल्या. कुसूर खानापूरमध्ये लक्ष्मी मनोहर नरोटे (नामाप्र) ९२१ मतांनी, औजमध्ये कविता भारत रुपनवरे (सर्वसाधारण) ५६२ मतांनी विजयी झाले. शिरवळमध्ये गौडणवरु शरणप्पा लक्ष्मण (नामाप्र) हे ८६८ मतांसह विजयी झाले. उळेवाडीमध्ये अक्षय गौतम गायकवाड (अनुसूचित जाती) हे ९९२ मतांसह विजयी झाले. वळसंगमध्ये जगदीश दयानंद अंटद हे (सर्वसाधारण) २२७० मतांनी विजयी झाले.

## कुसूरमध्ये भाजपाने पुन्हा सत्ता मिळवली, गावडेवाडीत पराभव

# सवतगव्हाणमध्ये निंबाळकर गटाचे एकहाती वर्चस्व

**माळीनगर :** सवतगव्हाण ग्रामपंचायत निवडणुकीत अकलूज खरेदी विक्री संघाचे चेअरमन नितीन निंबाळकर गटाने एकहाती वर्चस्व राखले.

सवतगव्हाण ग्रामपंचायत निवडणुकीपूर्वीच सरपंच आणि तीन सदस्यांची निवड बिनविरोध झाली होती. सहा सदस्य निवडीसाठी मतदान प्रक्रिया पार पडली. यामध्ये निंबाळकर गटाने निर्विवाद वर्चस्व सिध्द केल्याचे दिसून आले.

सरपंचपदी अनुसूचित जमातीतील रिना जीवन पवार, सदस्य पदासाठी राणी नागेश जाधव, किरण शेखर काळे, रोहिणी सुनिल बोरावके यांची बिनविरोध निवड झाली. या निवडणुकीत वॉर्ड क्रमांक-१ मधून करण प्रदीप इनामके, गजानन सदाशिव निंबाळकर, आक्का रणजित खरे, वॉर्ड क्रमांक-२ मधून यशराज नितीन निंबाळकर, वॉर्ड क्रमांक-३ मधून जयश्री हणमंत देखणे, रवी शंकर काळे आदी उमेदवार निवडून आले आहेत. यामध्ये जयश्री देखणे एकमेव उमेदवार विरोधी गटातून विजयी झाल्या.

## जयहिंद कारखान्याच्या बक्षीस योजनेचे होतोय स्वागत

# 'जयहिंद'ने ८० लाखांचे भार उचलत जाहीर केले कमीशन धोरण

सुराज्य/दक्षिण सोलापूर

आचेगाव (दक्षिण सोलापूर) येथील जयहिंद शुगर कारखान्याने ॲडव्हान्स व बिगर ॲडव्हान्स ऊसतोड वाहतूक ठेकेदारांसाठी आकर्षक बक्षीस योजना सुरू केली आहे. कारखान्याने ८० लाख रुपयांचा अतिरिक्त भार उचलत कमिशन धोरण जाहीर केले आहे. कारखान्याने जिल्ह्यातील एकमेव आकर्षक बक्षीस योजना राबविली असून, त्याचे स्वागत होत आहे.



गणेश माने देशमुख

बब्रुवान माने देशमुख

कारखान्याचे चेअरमन गणेश माने-देशमुख, मार्गदर्शक प्रेसिडेंट बब्रुवान माने-देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली कारखान्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांसह चालू गळीत हंगाम सन २०२३-२४ मध्ये ॲडव्हान्स व बिगर ॲडव्हान्समध्ये काम करणाऱ्या सर्व ऊसतोड वाहतूक ठेकेदारांना कारखान्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी आर. पी. देशमुख यांनी नवीन कमिशन धोरण व आकर्षक बक्षीस योजना पत्रकार परिषदेत जाहीर केले. यावेळी केन मॅनेजर चंद्रशेखर जेऊरे, ऊस संशोधक अधिकारी दत्तात्रय तोरणे, शेती अधिकारी विक्रमसिंह पाटील, राहुल घोगरे उपस्थित होते.

आर.पी. देशमुख पुढे म्हणाले की, 'या योजनेमुळे आर्थिकभाराचा कुठलाही परिणाम ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या एफआरपीवर होणार नसल्याचे सांगितले. यंदा सर्व ऊसतोड वाहतूक ठेकेदारांना जवळपास दहा टक्के अधिक कमिशन देण्यात येणार आहे.' नवीन ऊसतोड वाहतूक व कमिशन धोरण अशी राहणार आहे, ऊस वाहतूक १ ते ४० किमीपर्यंतच्या अंतरासाठी ४० किमी दर राहील. ४१ किमीपासून पुढील वाहतूक अंतर हे प्रत्यक्ष अंतरानुसार देण्यात येईल. ॲडव्हान्समध्ये ऊसतोड वाहतूक करणाऱ्या वाहनांसाठी तोडणी कमीशन २० टक्के, वाहतूक कमीशन २० टक्के देणार आहे. बिगर ॲडव्हान्समध्ये ऊस तोडणी वाहतूक करणाऱ्या वाहनांसाठी टनेजनुसार कमिशन देण्यात येईल. ॲडव्हान्स व बिगर ॲडव्हान्स वाहनांना विभाग, टनेजनुसार टोळी भाडे देण्यात येईल. ॲडव्हान्समध्ये वाहतूक करणाऱ्या मिनी कार्ट कमिशनात १६ टक्के वाढ राहील. बिगर ॲडव्हान्स वाहतूक करणाऱ्या मिनी कार्ट वाहनांना टनेजनुसार कमीशन देण्यात येईल. मशीनच्यामागे वाहतूक करणाऱ्या वाहनांना नवीन वाहतूक धोरण लागू होईल. ॲडव्हान्स व बिगर ॲडव्हान्स ऊसतोड वाहतूक करणाऱ्या वाहनांसाठी बक्षीस योजना अशी राहणार आहे. ट्रक-ट्रॅक्टरसाठी ५०० ते ७५० मेट्रिक टनासाठी ५ हजार रुपये, ७५१ ते १००० मे. टनासाठी ११ हजार रुपये, १००० मे. टनाच्या पुढे २१ हजार रुपये, मिनी ट्रॅक्टरसाठी ५०० ते ७५० मे. टनासाठी ५ हजार


नेहमीच ऊस उत्पादक शेतकरी, ऊसतोड वाहतूक ठेकेदार, कारखाना कामगारांचे हित लक्षात घेऊन जयहिंद शुगर परिवाराने मोठा आर्थिक भार उचलला आहे. कारखान्याने नवीन कमिशन धोरण, आकर्षक बक्षीस योजना सुरू केली आहे. या योजनेला सर्व संबंधित घटकांनी प्रतिसाद दिल्यास यंदा शंभर टक्के उद्दिष्ट गाठता येईल.

**- गणेश माने-देशमुख.**

चेअरमन, जयहिंद शुगर कारखाना, आचेगाव.



## संक्षिप्त वृत्त



अक्कलकोटः आ.सचिन कल्याणशेट्टी यांचा अक्कलकोट स्वामी मंदिरात सत्कार करताना महेश इंगळे, महेश हिंडोळे आदी.

### आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी घेतले अक्कलकोट स्वामींचे दर्शन

**अक्कलकोट** : आ.सचिनदादा कल्याणशेट्टी यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन स्वामी समर्थांच्या चरणी नतमस्तक होत स्वामी समर्थांचे आशीर्वाद घेतले. याप्रसंगी मंदिर समितीच्यावतीने चेअरमन, नगरसेवक महेश इंगळे यांनी आमदार कल्याणशेट्टी यांचा सन्मान केला. यानिमित्त मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनीही आमदार कल्याणशेट्टी यांचा सत्कार केला. याप्रसंगी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, व्यंकटेश पुजारी, तालुकाध्यक्ष मोतीराम राठोड, शहराध्यक्ष शिवशरण जोजन, नगरसेवक महेश हिंडोळे, नागेश कुंभार, विक्रम शिंदे आदींसह अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



**सांगोला** : सांगोला येथील आपुलकी प्रतिष्ठानच्यावतीने तृतीयपंथीयांना दिवाळी फराळासह कपडे देऊन त्यांच्या दिवाळीचा आनंद द्विगुणित केला.

### तृतीयपंथीयांना दिवाळी फराळ देऊन देण्यात आल्या शुभेच्छा

**सांगोला** : सांगोला येथील आपुलकी प्रतिष्ठानच्यावतीने चार तृतीयपंथीयांना दिवाळी फराळासह कपडे देऊन त्यांच्या दिवाळीचा आनंद द्विगुणित केला. यावेळी आपुलकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र यादव, हरिभाऊ जगताप, दादा खडतरे, अरविंद केदार, विकास देशपांडे, रविंद्र कदम आदी उपस्थित होते. त्याचबरोबर आपुलकी प्रतिष्ठानने वंचितांची दिवाळी गोड व्हावी म्हणून सांगोला शहरातील विविध भागात पालावर राहणाऱ्या नागरिकांना दिवाळी फराळ,भाऊबीजेची ओवाळणी म्हणून साडी भेट देण्यात येणार आहे. यासाठी आपुलकीने सोशल मीडियावर आवाहन केल्यानंतर आपुलकी सदस्य,देणगीदारांकडून सुमारे २६ हजार ५०१ रुपयांची देणगी जमा झाली आहे. त्या देणगीतून ५० कुटुंबाना येत्या शनिवार, दि. ११ नोव्हेंबर रोजी दिवाळीची भेट देण्यात येणार असल्याचे आपुलकीचे अध्यक्ष राजेंद्र यादव यांनी सांगितले.



**नातेपुते** : पिराळे येथे शिवसेना शिंदे गटाच्या शाखेचे उद्घाटन करण्यात आले. त्याप्रसंगी उपस्थित मान्यवर.

### पिराळेमध्ये शिवसेना शिंदे गटाच्या शाखेचे उद्घाटन

**नातेपुते** : पिराळे (माळशिरस) येथे शिवसेना शिंदे गटाच्या शाखेचे उद्घाटन माळशिरस तालुका शिवसेनाप्रमुख राजकुमार हिवरकर-पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सरपंच सुनील दडस, संदीप नरळे, चेअरमन वसंत दडस, शिवाजी लवटे, अमोल शिंदे, दत्तू लवटे, दादा लवटे, उमेश खिलारे, अनिल दडस, पिराळे शाखाप्रमुख आकाश खिलारे, उपप्रमुख उमेश जाधव, प्रमोद चिकणे, दादाभाई मुलानी, प्रभाग क्रमांकचे ७ प्रमुख सनी बरडकर, अध्यक्ष संदीप भागवत, उपाध्यक्ष राजू जाधव, सचिव माऊली देशमुख उपस्थित होते.

### कुरियरच्या कर्मचाऱ्यास पळविले; ६ लाख ७५ हजारांची लूट

**टेंभुर्णी** : कुरिअरच्या कर्मचाऱ्यास मोटारीतून पळवून नेऊन मारहाण करीत त्याच्या पिशवीतील रोख रकमेसह ६ लाख ७५ हजाराचे दागिने लुटून नेल्याची घटना टेंभुर्णी येथील बस स्थानकात शनिवारी सायंकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणात टेंभुर्णीच्या पोलिसांनी दरोड्याच्या गुन्हा दाखल केला असून त्यापैकी चौघांना नुकतीच अटक केली आहे. यासंदर्भात दरोडेखोरांच्या ताब्यातून सुटलेल्या अनिल नाथबुवा बोबडे (वय २९ रा.फलटण जि.सातारा, सध्या रा.इंदापूर) यांनी टेंभुर्णी पोलिसात फिर्याद दाखल केली. ते शनिवारी सायंकाळच्या सुमारास टेंभुर्णी येथील कुरिअरचे कार्यालय बंद करून इंदापूर कडे जाण्यासाठी बस स्थानकात आले होते. लघुशंकेस गेल्यानंतर चौघा अनोळखी आरोपींनी त्यांना तु आमचे पैसे बुडवून जातो काय ? असे म्हणत त्यांना मारहाण केली. आणि बळजबरीने मोटारीत बसवून त्यांना कुर्डूवाडी येथे नेले. आणि त्यांच्या सँग मधील ६ लाख २५ हजार रुपये रोख,१० ग्रॅम सोन्याची अंगठी आणि २ मोबाईल असा ऐवज लुटून मोटारीतून पोबारा केला. त्यानंतर अनिल बोबडे यांनी आपले कार्याल आणि पोलीसांशी संपर्क साधला. याची माहिती मिळाल्यानंतर टेंभुर्णीच्या पोलिसांनी त्यांना कुर्डूवाडी येथून पोलीस ठाण्यात आणले. त्यानंतर फिर्याद नोंदवून चौघा विरुद्ध पळवून नेऊन दरोडा टाकल्याचा गुन्हा दाखल केला. त्यापैकी चौघांना सोमवारी अटक करण्यात आली.त्यांना मंगळवारी न्यायालयासमोर हजर करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. पुढील तपास पोलीस निरीक्षक दीपक पाटील करीत आहेत.

# मराठा समाजाला कुणबी दाखले देण्यासाठी जिल्हास्तरावर समन्वय समिती

## तालुकास्तरावर उपविभागीय अधिकारी यांची समिती

**सुराज्य/सोलापूर**

मराठवाड्यातील जिल्हा प्रशासनाकडून ज्या पद्धतीने दाखले वितरित करण्यात आले आहेत. त्या पद्धतीने अन्य जिल्ह्यात कार्यवाही करावी. सोलापूर जिल्ह्यात मराठा समाजाला कुणबी दाखले वितरित करण्यासाठी बारा प्रकारच्या पुराव्याची तपासणी करण्यासाठी तालुकास्तरावर उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापित करण्यात आलेली आहे. या समितीने पुराव्याची तपासणी करावी असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.

जिल्हास्तरावर निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली समन्वय कक्षाची स्थापना करण्यात आलेली आहे. तर प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय समिती गठीत करण्यात आलेल्या आहेत. तहसीलदार हे त्या समितीचे सहअध्यक्ष आहेत.. या समितीमध्ये गटविकास अधिकारी पंचायत समिती, गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती, पोलीस निरीक्षक, पोलीस निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, उपनिबंधक सहकारी संस्था, उपअधीक्षक भूमी अभिलेख, मुख्याधिकारी नगरपालिका यांचा सदस्य म्हणून समावेश करण्यात आलेला आहे.

तालुकास्तरीय समितीमध्ये अन्य विभागाचे अधिकारी आवश्यक असल्यास समिती अध्यक्षाने त्यांचा समितीत समावेश करावा. या समितीने तहसील कार्यालयामध्ये मराठा कुणबी पुरावे गोळा करण्यासाठी व दाखला देण्यासाठी तालुका स्तरावर मदत कक्ष स्थापन करावा. या समितीने गाव पातळीवरील अभिलेखाचा शोध



घेण्यासाठी गावस्तरीय समितीची नेमणूक करावी समितीने कुणबी मराठा पुरावे आपले कार्यालयात शोध घेऊन त्याबाबतचे पुरावे व विहित नमुन्यातील अहवाल समिती अध्यक्ष व सहअध्यक्ष यांच्याकडे सादर करावेत. अध्यक्ष व सहअध्यक्ष यांनी कुणबी दाखले वितरण करण्याबाबत शासन नियम व सुधारित शासन निर्णयानुसार पुढील कार्यवाही करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिल्या.

**चौकट..**

मराठा कुणबी प्रमाणपत्र देण्याबाबत शासकीय विभागांनी १९४८ पूर्वीचे तसेच १९४८ ते १९६७ पर्यंतचे विविध शासकीय अभिलेखांची तपासणी करावी त्यामध्ये कुणबी नोंदी असलेली कागदपत्रे शोधून काढावीत. जिल्हा परिषद ग्रामपंचायत विभाग, महसूल विभाग, शिक्षण विभाग, राज्य उत्पादन शुल्क, कारागृह अधीक्षक, पोलीस विभाग, रेल्वे विभाग, सह जिल्हा उपनिबंधक, भूमी अभिलेख, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, जिल्हा वक्फ अधिकारी कार्यालय, महापालिका व नगरपालिका या विभागाने उपरोक्त कालावधीतील सर्व अभिलेखांची तपासणी करण्याचे आदेश निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हास्तरीय समन्वय समिती कक्षाचे प्रमुख दादासाहेब कांबळे यांनी दिले आहेत

### गायिका पौडवाल मंगळवारी सोलापुरात

**सोलापूर** : यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई आणि सिप्निया लिमिटेड कंपनी यांच्या वतीने मंगळवार ७ नोव्हेंबर रोजी सकाळी आकरा वाजता डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात कर्णबधिर लाभार्थींना पार्श्वगायिका श्रीमती अनुराधा पौडवाल यांच्या हस्ते श्रवण यंत्र मोफत वाटप केले जाणार आहे. यशवंतराव चव्हाण सेंटर



जिल्हा केंद्राचे जेष्ठ सदस्य दत्ता गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणाऱ्या कार्यक्रमास सिप्निया कंपनीचे सीईओ अविनाश पवार. यशवंतराव चव्हाण सेंटरचे सीईओ दीप्ती नाखले.

जिल्हा केंद्राचे कोषाध्यक्ष राजशेखर शिवदारे, जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्राचे अध्यक्ष माजी आमदार प्रकाश यलगुलवार प्रमुख पाहुणे असणार आहेत. शहर वासियांनी कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्रातर्फे करण्यात आले आहे.



### दक्षिण सोलापूर तालुक्याचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश करा

#### एम.के.फाऊंडेशनतर्फे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**सुराज्य/दक्षिण सोलापूर**

जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर येथे दक्षिण सोलापूर तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करणे बाबत एम के फाउंडेशन च्या वतीने लेखी निवेदन देण्यात आले.

संपूर्ण दक्षिण तालुक्यातील खरीप हंगामातील पीक पावसाअभावी गेले असून, तसेच सरासरी पेक्षा पाऊस खूप कमी झाल्या कारणाने रब्बी हंगामातील पिकांचे देखील उत्पादन होणार नाही, तसेच जनावरांच्या चाऱ्याचा व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणात उद्भवणार आहे. अश्या ह्या कठीण परिस्थितीमध्ये दुष्कळग्रस्त तालुक्यांच्या जाहीर यादीत दक्षिण सोलापूर तालुक्याचा समावेश नसून हा तालुक्यातील शेतकरी व जनतेवर मोठा अन्याय आहे, तात्काळ दक्षिण सोलापूर तालुक्याचा दुष्काळ ग्रस्त तालुका यादीत समावेश करावा अशी मागणी महादेव कोगनुरे यांनी निवेदनाद्वारे केली. जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत व्हिडिओ कॉन्फरन्स चालू असल्या कारणानेअप्पर उपजिल्हाधिकारी दादासाहेब कांबळे यांनी निवेदन स्वीकारले. याप्रसंगी माजी संचालक महादेव पाटील, सादेपूर सरपंच मलकारी व्हनमाने, प्रकाश वाघमारे, रविकांत चांदोडे, सुनील पारे, गुरुसिद्धप्पा बिराजदार, सागर नरोनी, मालप्पा घोडके, अमित मुळवाड, शरणु मुलगे, संजय केंगनार, पवन कोमूल, सोम करपे, अजित पाटील, शिवाजी राठोड आदी उपस्थित होते.

#### लोकशाही दिनात तक्रारदाराला न्याय देण्यासाठी

### विभागप्रमुख हाजीर हो! जिल्हाधिकाऱ्यांचे फर्मान

**सुराज्य/सोलापूर**

जिल्हास्तरीय लोकशाही दिनात मोठ्या प्रमाणात तक्रारी दाखल होत आहेत. त्यांना समाधानकारक उत्तर मिळत नसल्याने तक्रारदारांला न्याय मिळत नाही त्यामुळे पुन्हा पुन्हा तक्रार करतो ये टाळण्यासाठी तक्रारदारांला न्याय देण्यासाठी विभाग प्रमुखांनी समक्ष हजर राहत तक्रारदारांला न्याय द्यावा असे फर्मान जिल्हाधिकाऱ्यांनी काढले आहे.



जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित जिल्हास्तरीय लोकशाही दिनामध्ये प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चर्चा करताना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद मार्गदर्शन केले. निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब कांबळे, उत्पादन शुल्क अधीक्षक नितीन धार्मिक, जिल्हा प्रशासनाधिकारी नगरपालिका वीणा पवार यांच्यासह अन्य विभागाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

सोमवारच्या जिल्ह्यस्तरीय लोकशाही दिनात २५ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यामध्ये भूमी अभिलेख, जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभाग, महसूल, भविष्य निर्वाह निधी, जिल्हा उपनिबंधक, कामगार विभाग, जिल्हा परिषद ग्रामपंचायत विभाग, महावितरण, ऑफिसर्स क्लब, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पंढरपूर नगरपरिषद, प्रदूषण महामंडळ, भूसंपादन, पाटबंधारे विभाग, पोलीस विभाग, आरटीओ व जिल्हा जात पडताळणी समिती आदीबाबत तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. प्रलंबित असलेले सर्व अर्ज पंधरा दिवसात निकाली निघावेत. तक्रारी कक्षामार्फत तात्काळ संबंधित विभागाकडे पाठवल्या जातात, त्यावरही अत्यंत गतीने कार्यवाही करून तक्रार अर्जाचा निपटारा करावा अशा सूचना केल्या.



### प्रभाग-२२ मध्ये रस्ते कामाचा शुभारंभ

**सुराज्य/सोलापूर**

प्रभाग क्रमांक-२२ च्या विकासासाठी दूरदृष्टी डोळ्यासमोर ठेवून अती दुर्गम भागामध्ये नागरिकांना मूलभूत सुविधा देण्यासाठी आपण अग्रेसर असल्याचे मत राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी गटनेते किसन जाधव यांनी व्यक्त केले.

प्रभाग-२२ येथील यतिम खाना दोन नंबर झोपडपट्टी अस्लम शेख घर ते रोनक बेकरीपर्यंत रस्ता काँक्रिटीकरण कामांचा शुभारंभ केला. नगरसेवक किसन जाधव, नागेश गायकवाड यांच्या प्रयत्नातून शुभारंभ केला.

यावेळी आरिफ शेख, जाकीर शेख, अस्लम शेख, इब्राहिम शेख, यासीन शेख, मुस्तफा शेख, शाहजान शेख, जब्बार काटेवाले, यासीन शेख, राहुल भोसले, बाळू बीडकर, समीर आत्तार, इमरान शेख, अब्दूल सय्यद, माऊली जरग, माणिक कांबळे, महादेव राठोड आदी उपस्थित होते.

### खासदार महास्वामीजी मतदार संघातून गायब

#### शिवसेनेचे जिल्हाधिकाऱ्यांना शोधण्याचे साकडे

**सुराज्य/सोलापूर**

सोलापूरचे खासदार डॉ. जयसिद्धेश्वर महाराज गेल्या अनेक काळापासून मतदार संघात दिसत नाहीत. मतदारांना भेटत नाहीत, कोणीही त्यांना भेटण्यासाठी गेल्यास त्यांचा पत्ताच नसतो. त्यामुळे त्यांचं काही बरं वाईट झाले नाही ना किंवा मतदार संघातून पळून गेले का, अशी शंका निर्माण होत आहे. किंवा त्यांचं कोणी अपहरण केले तर नाही अशा हरवलेल्या खासदारांचा शोध घ्यावा, असे साकडे शिवसेना ठाकरे गटाच्यावतीने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना घालण्यात आले.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपनेते शरद कोळी,



अस्मिता गायकवाड, संपर्कप्रमुख उत्तमप्रकाश खंदारे, लोकसभा क्षेत्र प्रमुख पुरुषोत्तम बरडे यांच्या नेतृत्वाखाली व जिल्हाप्रमुख गणेश वानकर पालिका क्षेत्रप्रमुख विष्णू कारमपुरी, उपजिल्हाप्रमुख प्रताप चव्हाण, दत्ता गणेशकर, संतोष पाटील शहरप्रमुख, महेश धाराशिवकर, दत्तात्रय वानकर, संतोष केंगनाळकर, महिला आघाडी जिल्हा संघटिका प्रिया बसवंती यांच्या प्रमुख उपस्थितीत हे साकडे घालण्यात आले.

यावेळी शिवसैनिकांनी हडप झडप खासदार गडप, परत या परत या खासदार जयसिद्धेश्वर महाराज परत या, मुंबई दिल्ली कलकत्ता सोलापूरचे खासदार बेपत्ता अशा घोषणा दिल्या. अप्पर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. यावेळी रविकांत कांबळे, दत्तात्रय गणेशकर, भीमाशंकर म्हेत्रे, दत्तात्रय वानकर, शरणराज केंगनाळकर, बालाजी चौगुले, विजय पुकाळे, अमित भोसले, सुरेश जगताप, लहू गायकवाड, बाळासाहेब गायकवाड, राजू बिराजदार, निरंजन बोद्धुल, सुशील कन्नूर, अनिल कोंडूर, शेखर इराबती, रेवन बुक्कानरे, सोमनाथ शिंदे, जर्गीस मुल्ला, संदीप बेळमकर, संजय गवळी, तुषार अवताडे, रेवण पुराणिक, शुभम स्वामी, राहुल परदेशी, संभाजी कोडगे, रवी गायकवाड, पूजा खंदारे आदी उपस्थित होते.

### रे नगर मधील नागरिकांना मिळणार ५०० रुपयांमध्ये वीज कलेक्शन

#### श्रमिकांच्या व सिटूच्या लढ्याला यश मिळाले आहे : कॉ.आडम मास्तर

**सुराज्य/सोलापूर**

रे नगर मधील तीस हजार लाभार्थ्यांना नाममात्र म्हणजे फक्त पाचशे रुपये दराने नवीन वीज जोडणी देण्याबाबत दोन नोव्हेंबर रोजी असंघटित कामगारांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर महामोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये पन्नास ते साठ हजार श्रमिकांनी सहभाग नोंदविला होता. श्रमिकांनी दिलेल्या लढ्याला व सिटूने काढलेल्या मोर्चाला यश आले असून लालबावट्याचा विजय झाल्या असल्याचे मत ज्येष्ठ नेते माजी आमदार कॉ. नरसय्या आडम मास्तर यांनी व्यक्त केले आहे.

महावितरणने आडम मास्तर यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, मौजे कुंभारी तालुका दक्षिण सोलापूर येथील प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत कामगारांसाठी बांधण्यात येत असलेल्या घरकुलांना वीज पुरवठा करण्यासाठी लाभार्थ्यांकडून फक्त पाचशे रुपयाचे शुल्क भरून घेण्यात यावे अशा सूचना



मुख्य कार्यालयाकडून मुख्य अभियंता महावितरण बारामती परिमंडळ यांनी भ्रमणध्वनी द्वारे सुरक्षा ठेव रकमेबाबत दिल्या आहेत त्याप्रमाणे प्रक्रिया शुल्क १२० रुपये अधिक १८ टक्के जीएसटी प्रति विज जोडणी व सुरक्षा ठेव रक्कम ३८० रुपये प्रति विज जोडणी पहिल्या वीज बिलामधून पुनर प्राप्त करून घेणे बाबत सूचना दिल्या असल्यामुळे फक्त पाचशे रुपयांमध्ये या परिसरातील नागरिकांना वीज जोडणी करून देण्यात येणार असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. या महामोर्चात सिटूचे राज्य महासचिव डॉ.एम.एच.शेख, नलिनीताई कलबुर्गी, युसुफ मेजर, नसीमा शेख, डॉ.अनिल वासम, विल्यम ससाणे, वसीम मुल्ला, वीरेंद्र पद्मा, विक्रम कलबुर्गी, दाऊद शेख, सलीम मुल्ला, सनी शेट्टी, व्यंकटेश कोंगारी, सिद्धप्पा कलशेट्टी, शेवंता देशमुख, सुनंदा बल्ला, शकुंतला पानिभाते आदीसह शेकडो कार्यकर्ते परिश्रम घेतले.

### तुळशी, उळे गावात निवडणुकीवरून मारहाण

**सुराज्य/सोलापूर**

सोमवारी माढा तालुक्यातील तुळशी आणि उळेगाव (ता.दक्षिण सोलापूर) अशा दोन ठिकाणी ग्रामपंचायत निवडणुकीच्या कारणावरून काठी, दगड आणि लाथाबुक्याने केलेल्या मारहाणीत महिलेसह ६ जण जखमी झाले.

त्यापैकी पहिली घटना तुळशी (ता.माढा) येथे आज सकाळी ११ वाजेच्या सुमारास घडली. काठी आणि दगडाने झालेल्या मारहाणीत अमोल राजाराम हाटगे (वय२६), मारुती शिवाजी खाडे (वय ३२), त्यांचा मुलगा अर्जुन खाडे (वय १०), अक्षय दिगंबर काशीद (वय २३) आणि सुरेखा दिगंबर काशीद (वय ६० सर्व रा. तुळशी) असे पाच जण जखमी झाले. त्यांना गावातील खोडवस्ती जवळ राहुल सुरवसे, निलेश सुरवसे, बापू लामकाने यांच्यासह इतर १० जणांनी मारहाण केली. त्यांना मोडनिंब येथे प्राथमिक उपचार करून शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

दुसरी घटना आज सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास उळेगाव (ता.दक्षिण सोलापूर)येथे घडली. अक्षय ज्ञानेश्वर मुत्तेलू (वय २६) असे जखमींचे नाव आहे. त्याला गंभीर अवस्थेत शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले. सायंकाळच्या सुमारास त्याला आप्पासाहेब झळकी,प्रवीण शिंदे,संकेत धनके आणि इतर १२ जणांनी मिळून काठी आणि लाथाबुक्क्याने मारहाण केली. अशी प्राथमिक नोंदी तालुका पोलिसात झाली.